# ख्रिस्ताचा जलप्रलयापूर्वीचा वधस्तंभ



एड्रियन एबेन्स

# ख्रिस्ताचा जलप्रलयापूर्वीचा वधस्तंभ

माझे खास मित्र मार्क आणि एलिझाबेथ
फ्युरी यांना समर्पित

MARANATHA
MEDIA
maranathamedia.com

May 2025

या पुस्तकाचा मराठी अनुवाद भाऊ जोएल एलिझाबेथ सालवी यांनी केला आहे आणि पुस्तकाचे पुनर्वाचन ताई वोईलेट डिसोझा यांनी केले आहे.

# सामग्री


वधस्तंभच किल्ली आहे.......... 2

नोहाने संपूर्ण जगावर खंडणीचा डाव चालवला होता काय?..........3

हिंसाचाराने भरलेली.......... 6

भ्रष्टतेकडे/विनाशाकडे नेणारा मार्ग.......... 9

मृत्यू पापामुळे होतो, देवामुळे नाही.......... 17

ख्रिस्त पित्याच्या स्वभावाचं परिपूर्ण प्रकटीकरण आहे..........20

मृत्यूची भीती निर्माण करणारा महान खोटा विश्वास.......... 23

ख्रिस्ताने मृत्यू रद्द केला आहे..........25

पित्याच्या प्रेमाचे प्रकटीकरण..........31

जलप्रलयाद्वारे कालवरी प्रकट झाली.......... 33

देवाने प्रहार केलेला व पिडलेला असे आम्ही त्याला लेखले..........38

आपल्या पूर्ण मनाने पित्याचा शोध घेणे.......... 39

## वधस्तंभच किल्ली आहे

संपूर्ण जगभर झालेल्या महापूराची कथा अनेकांना अस्वस्थ करणारी वाटते. खरंच, देव आपल्या दयाळूपणाचा अंत होईपर्यंत थांबेल आणि मग आपल्या न्यायाचा प्रचंड हात उगारून लाखो लोकांना बुडवेल काय? एक प्रेम करणारा देव असं काही करू शकतो काय? अनेकांसाठी हा प्रश्न खूपच गोंधळात टाकणारा आहे. मात्र, खालील शब्द काळजीपूर्वक लक्षात घ्या — कारण यामध्येच या रहस्याचं उत्तर दडलं आहे:

"वधस्तंभाचे रहस्य इतर सर्व रहस्यांना उलगडते." कालवरीवरून जेव्हा प्रकाश आपल्यावर पडतो, त्याच्या उजेडात देवाचे जे गुणधर्म आपल्याला पूर्वी भीती व थरकापाने भरून टाकायचे, तेच गुणधर्म आता सुंदर आणि आकर्षक वाटायला लागतात. दयाळूपणा, कोमलता आणि पित्याचे प्रेम — हे सर्व आता देवाच्या पवित्रतेशी, न्यायाशी आणि सामर्थ्याशी एकरूप झालेलं दिसते. जेव्हा आपण त्याच्या सिंहासनाचं गौरव आणि भव्यतेसह दर्शन घेतो — तेव्हा त्याचवेळी आपण त्याच्या स्वभावाची कोमल झलक सुद्धा पाहतो. आणि आणि तेव्हाच "आपला पिता" हे शब्द खऱ्या अर्थाने आपल्याला समजू लागतात. – ग्रेट कॉन्ट्रव्हर्सी ६५२.१

## नोहाने संपूर्ण जगावर खंडणीचा डाव चालवला होता काय?

एक माणूस सौम्यपणे किराणाच्या दुकानात येतो आणि दुकानदाराला सांगतो की त्याच्या व्यवसायावर एक गंभीर आपत्ती आहे. तो म्हणतो, "तुमच्या व्यवसायावर आणि कुटुंबावर लवकरच एक अटळ आपत्ती येणार आहे. या आपत्तीपासून वाचायचं असेल तर तुम्हाला आमच्या संरक्षणाखाली यावं लागेल. आम्ही एक 'संरक्षणाचे जहाज' तयार केलं आहे फक्त अशांसाठीच जे आम्हाला खरे स्वातंत्र्याचे रक्षक मानतात." तो माणूस स्पष्ट करतो की त्याचा हेतू दुकान मालकाला त्या विनाशापासून वाचवण्याचा आहे — जो प्रत्येकावर येणार आहे जे हे संरक्षण स्वीकारणार नाहीत.

तो सौम्यपणे दुकानदाराच्या खांद्यावर हात ठेवतो आणि कळकळीने विनंती करतो की, त्याने ह्या "दयेच्या" अहवानाचा नीट विचार करावा. "आम्हाला तुमचं किंवा तुमच्या कुटुंबाचं काही वाईट व्हावं असं अजिबात वाटत नाही. तसं झालं तर आम्हालाच खूप वाईट वाटेल."

पण जर तो विनाश घडवून आणणारे तेच लोक असतील, ज्यांचं प्रतिनिधित्व हा माणूस

करत आहे, तर हे कृत्य खंडणीच्या गुन्ह्यांत येते. ही एक अशी जबरदस्तीची पद्धत आहे ज्यामध्ये धमकी, दहशत किंवा दबाव टाकून एखाद्याच्या इच्छेवर ताबा मिळवला जातो.

जो विनाशाची धमकी देतो, आणि ज्या गटाकडून तो विनाश होणार आहे, त्या गटाचंच तो प्रतिनिधित्व करतो — तोच माणूस खरोखरच करुणेचा संदेश देऊ शकतो का?

बायबलमधील महापुराची गोष्ट खरंच एक जागतिक खंडणीखोरी आहे का? बायबलमधील देव अशा प्रकारे वागतो का — की जे लोक त्याचे आदेश पाळतात त्यांना तो संरक्षण देतो आणि जे त्याला नाकारतात त्यांना तो ठार मारतो?

उत्पत्ती ६*:*१३-१४ मग देव नोहाला म्हणाला*, "*सर्व प्राण्यांचा अंत करण्याचे माझ्या मनात आले आहे*,* कारण त्यांच्यामुळे पृथ्वीवर जाचजुलूम माजला आहे*.* पाहा*,* मी पृथ्वीसह त्यांचा नाश करीन*.* तू आपल्यासाठी गोफेर लाकडाचे तारू कर*;* त्या तारवात कोठड्या कर आणि त्याला आतून व बाहेरून डांबर लाव*.*

बायबल सांगते की पृथ्वी जाचजुलूमाने भरली होती. मग, हिंसाचार या कारणावरून लोकांना हिंसकपणे नष्ट करणं यात काही अर्थ आहे का? हे ढोंगीपणाचं उदाहरण ठरणार नाही का?

*"*नाश करणे*"* या इंग्रजी शब्दासाठी मूळ हिब्रू भाषेत वापरलेला शब्द आहे*: H7843 —* मूळ क्रियापद*;* याचा अर्थ होतो*:* सडणे*,* खराब होणे*,* नाश करणे*;* हेतुपूर्वक बिघडवणे*,* नष्ट करणे *(*शाब्दिक किंवा रूपकदृष्ट्या*) —* जसे की फोडणे*,* फेकून देणे*,* भ्रष्ट करणे*,* बिघडवणे*,* पूर्णपणे वाया घालवणे*.*

हाच शब्द आधीच्या दोन वचनांमध्येही वापरलेला आहे: उत्पत्ति ६:११-१२ त्या काळी देवाच्या दृष्टीने पृथ्वी भ्रष्ट झाली होती; ती जाचजुलमांनी भरली होती. देवाने पृथ्वीकडे अवलोकन केले तर पाहा, ती भ्रष्ट होती; कारण पृथ्वीवरील सर्व प्राणिमात्रांनी आपली चालचलणूक बिघडवली होती.

जर आपण या ठिकाणी इंग्रजी "destroy" (नष्ट) हा शब्द मूळ हिब्रू अर्थानुसार वापरला, तर तो उतारा अशा प्रकारे वाचता येईल:

उत्पत्ती ६*:*११-१२ *"*पृथ्वी आधीच देवापुढे नष्ट झाली होती, आणि ती हिंसाचाराने भरली होती. देवाने पाहिले आणि पाहा — ती नष्ट झाली होती*;* कारण सर्व माणसांनी आपले मार्ग भ्रष्ट करून टाकले होते*."* म्हणजे काय*?*

पृथ्वी आधीच नष्ट झाली होती — म्हणजेच, मानवी समाजाने आपली विचारसरणी, आपली नीतिमत्ता, आपला जगण्याचा मार्ग पूर्णपणे भ्रष्ट केला होता. ते लोक पूर्ण

हिंसक झाले होते. त्यांनी स्वतःवरच नाश ओढवून घेतला होता.

# हिंसाचाराने भरलेली

त्या काळी संपूर्ण जग सैतानाच्या विचारसरणीचं स्पष्ट स्वरूप झालं होतं. शास्त्र आपल्याला या हिंसाचाराच्या मूळ स्रोताबद्दल सांगते:

यहेज्केल २८:१६ तुझे कारागिरीचे पदार्थ बहुविध असल्यामुळे अरामी लोक तुझ्याबरोबर व्यापार करत; ते तुझ्या मालाबद्दल तुला पाचू, जांभळा रंग, तागाची वेलबुट्टीदार उत्तम वस्त्रे, प्रवाळ व माणके देत.

हे ख्रिस्ताच्या स्वभावाशी पूर्णपणे विरोधात आहे — ज्याच्याविषयी शास्त्र सांगते की, तो कोणताही हिंसाचार करत नाही:

यशया ५३:९ त्याची कबर दुर्जनांच्या कबरांमध्ये नेमली होती आणि तो मेल्यावर धनवंताची कबर त्याला प्राप्त झाली; तथापि त्याने काही अधर्म केला नव्हता, त्याच्या मुखात काही कपट नव्हते.

राजाच्या पुत्राविषयी सांगताना, स्तोत्रकार म्हणतो:

स्तोत्र ७२:१४ जुलूम व जबरदस्ती ह्यांपासून त्यांचे जीव तो मुक्त करील; आणि त्याच्या दृष्टीने त्यांचे रक्त अमोल ठरेल;

तर मग, देवपुत्र स्वतः कधीही हिंसाचार करत नाही, आणि ज्यांना तो मुक्त करतो त्यांना तो हिंसक वागणुकीपासून वाचवतो — तसेच त्यांना दुसऱ्यांकडून होणाऱ्या हिंसाचारापासूनही सुरक्षित ठेवतो. सैतान मात्र हिंसाचाराने भरलेला आहे, आणि त्याने हा हिंसक आत्मा संपूर्ण जगभर पसरवला. मग असा काय मुद्दा आहे, ज्यामुळे सैतान इतक्या हिंसक वृत्तीने भरून जातो?

स्वर्गदूतांनी आनंदाने ख्रिस्ताच्या सार्वभौमत्वाची कबुली दिली, आणि स्वतःला त्याच्या चरणी नम्र करून, त्याच्यावर आपले प्रेम व भक्ती व्यक्त केली. लूसिफर देखील त्यांच्या बरोबर झुकला, पण त्याच्या मनात एक विचित्र व तीव्र संघर्ष चालू होता. सत्य, न्याय आणि निष्ठा हे गुण त्याच्या अंतःकरणात ईर्ष्या आणि हेव्याशी झुंज देत होते. *(Patriarchs and Prophets,* पान ३६–३७*) Oo*

*"का?"* असा प्रश्न या सामर्थ्यशाली देवदूताने विचारला—*"*का ख्रिस्ताला सर्वोच्चता दिली जावी*?* लूसिफरपेक्षा त्याला अधिक सन्मान का दिला जातो*?"* पित्याच्या तात्काळ उपस्थितीतून आपली जागा सोडून, लूसिफर स्वर्गदूतांमध्ये असंतोषाचा आत्मा पसरवायला निघाला.

त्याने गुप्तपणे आणि कौशल्याने काम केलं, आणि काही काळ त्याने आपला खरा हेतू लपवला — देवाबद्दलची भक्ति दाखवत. त्याने स्वर्गातील नियमांविषयी संशय निर्माण करायला सुरुवात केली — असं सूचित केलं की, जरी नियम जगातील लोकांसाठी गरजेचे असतील, तरी स्वर्गदूत हे सर्वोच्च प्राणी असल्यामुळे त्यांना कुठल्याही मर्यादांची गरज नाही, कारण त्यांचं स्वतःचं ज्ञान पुरेसं आहे मार्गदर्शनासाठी. त्यांना देवाचा अपमान करणं शक्यच नाही; त्यांचे सर्व विचार पवित्र आहेत; ते चुकतील अशी शक्यता तितकीच अशक्य आहे, जितकी देवाच्या बाबतीत आहे. देवपुत्राला पित्याच्या बरोबरीचे मानून त्याला उंच स्थान देणं — हे लूसिफरसाठी अन्यायच आहे, असं दाखवण्याचा प्रयत्न झाला — कारण लूसिफरलाही आदर व प्रतिष्ठा मिळायलाच हवी, असं त्याचं मत होतं. *(Patriarchs and Prophets,* पान ३७*)*

सैतानाचं ख्रिस्तावरील द्वेष इतकं तीव्र झालं होतं की त्याने सुरुवातीपासूनच देवपुत्राला ठार मारण्याचा कट रचला होता. ख्रिस्ताच्या क्रुसावरच्या मृत्यूमुळे संपूर्ण विश्वासमोर सैतानाच्या खऱ्या हेतूंचा पर्दाफाश झाला — जे हेतू त्याच्या मनात या जगाच्या निर्मिती पूर्वीपासूनच होते.

योहान *८:४४* तुम्ही आपला बाप सैतान ह्यापासून झाला आहात आणि तुमच्या बापाच्या वासनांप्रमाणे करू इच्छिता. तो प्रारंभापासून मनुष्यघातक होता आणि तो सत्यात टिकला नाही; कारण त्याच्यामध्ये सत्य नाही. तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वतःचे बोलतो; कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे.

सैतानाच्या या खुनखार हेतूचं मूळ त्याच्या हिंसक वृत्तीतच आहे. हे जग देव आणि त्याच्या पुत्राच्या प्रतिमेत निर्माण झालं, आणि जेव्हा सैतानाने बागेत त्या निरागस जोडप्याला पाहिलं, तेव्हा तो ईर्ष्येने पेटला आणि त्यांचा विनाश करण्याचा त्याने निर्धार केला.

स्वर्गात बंड करण्याचे स्वातंत्र्य हरवले असल्याने, सैतानाने देवाविरुद्धचा आपला वैर आता मानवजातीच्या विनाशामध्ये व्यक्त केला. एदेन बागेत त्या पवित्र जोडप्याच्या आनंदात आणि शांततेत त्याला स्वतःच्या कायमच्या हरवलेल्या सौख्याचं दृश्य दिसलं. ईर्ष्येने प्रेरित होऊन, त्याने ठरवलं की त्यांना देवाच्या आज्ञेचं उल्लंघन करायला प्रवृत्त करायचं, आणि त्यांच्यावर पापाचं दोष व शिक्षेचं ओझं टाकायचं. त्यांचं प्रेम तो अविश्वासात बदलणार होता, आणि त्यांची स्तुतिगीते तक्रारींमध्ये बदलणार होता. यामुळे ते निरागस (<u>मानव</u>)प्राणी स्वतः सैतानासारख्याच दुःखात लोटले गेले असते, आणि याचबरोबर देवाचाही अपमान झाला असता, आणि स्वर्गात दुःख पसरलं असतं. (Patriarchs and Prophets, पान ५२.१)

जेव्हा आदाम आणि हवेने पाप केलं, तेव्हा त्यांनी या द्वेष आणि ईर्ष्येच्या आत्म्याला स्वतःच्या हृदयात आमंत्रण दिलं. ते सैतानासोबत देवाविरुद्ध एकरूप झाले.

पापी माणूस आणि पापाचा जनक यांच्यामध्ये नैसर्गिक शत्रुत्व मुळीच नसतं. दोघेही धर्मत्यागामुळे वाईट झाले. धर्मत्यागी व्यक्तीला कधीच विश्रांती मिळत नाही, जोपर्यंत तो इतरांना स्वतःच्या मार्गावर चालायला प्रवृत्त करून त्यांची सहानुभूती आणि पाठिंबा मिळवत नाही. म्हणूनच पडलेले स्वर्गदूत आणि दुष्ट माणसं एकत्र येतात, आणि एकप्रकारच्या घातकी मैत्रीत बांधले जातात. जर देवाने विशेष हस्तक्षेप केला नसता, तर सैतान आणि माणूस स्वर्गाविरुद्धच्या युद्धात सामील झाले असते; आणि सैतानाविरुद्ध वैर बाळगण्याऐवजी, संपूर्ण मानवजातच देवाविरुद्ध एक झाली असती. (The Great Controversy, पान ५०५.२)

हा तोच आत्मा आहे जो संपूर्ण मानवजातीमध्ये आहे — देवपुत्र ख्रिस्ताविरुद्ध असलेला द्वेषाचा आत्मा. हा द्वेष कुठून येतो हे स्पष्टपणे दिसत नाही, समजणंही सहज शक्य नाही. पण माणसाचं नैसर्गिक मन — ख्रिस्ताच्या आत्म्याविरुद्ध आपोआप प्रतिक्रिया देतं, आणि हळूहळू ती प्रतिक्रिया हिंसेच्या रूपात बाहेर पडते.

मनुष्य एकच कारणामुळे जिवंत राहू शकत होता ते म्हणजे — ख्रिस्त मनुष्याला आपलं जीवन देत राहील. म्हणूनच बायबल ख्रिस्ताला “जगाच्या सुरुवातीपासून वध करण्यात आलेला कोकरू” म्हणतं *(प्रकटी १३:८).* ख्रिस्त आपल्या अधर्मांमुळे जगाच्या प्रारंभापासूनच जखमी होत गेला आहे. तो आपल्या पापांमुळे छळला जात आहे. तरीही, मानवाला वाचवण्यासाठी, ख्रिस्ताने सैतानाच्या पेटवलेल्या या द्वेषाच्या विरोधात प्रत्येक माणसाला आपल्या खांद्यावर उचलून घेतलं आहे.

यशया ६३:९ त्यांच्या सर्व दुःखाने तो दुःखी झाला, त्याची प्रत्यक्षता दर्शवणाऱ्या दिव्यदूताने त्यांचे तारण केले; त्याने आपल्या प्रीतीने व आपल्या करुणेने त्यांना उद्धरले; पूर्वीचे सर्व दिवस त्याने त्यांचे लालनपालन केले.

माणसाच्या नैसर्गिक मनात असलेला ख्रिस्ताच्या आत्म्यावरील द्वेष पवित्र आत्म्याच्या प्रेरणा दडपून टाकतो, आणि त्यामधून द्वेष व हिंसा निर्माण होतात, जी इतरांवर व्यक्त होते.

मत्तय २५:४० तेव्हा राजा त्यांना उत्तर देईल, ‘मी तुम्हांला खचीत सांगतो की, ज्या अर्थी तुम्ही ह्या माझ्या कनिष्ठ बंधूंपैकी एकाला केले, त्या अर्थी ते मला केले आहे.’

हा मुद्दा समजून घेणं अत्यंत महत्त्वाचं आहे — सर्व हिंसा ही सैतानाने ख्रिस्ताविरुद्ध पेटवलेल्या द्वेषातूनच प्रेरित होते. म्हणून, एखाद्या हिंसेचा मूळ स्रोत आपल्याला माहीत नसला तरीसुद्धा, प्रत्येक हिंसा म्हणजे ख्रिस्ताविरुद्धचं द्वेष प्रकट करणं आहे.

उत्पत्ती सहाव्या अध्यायात वर्णन केलेली हिंसा म्हणजे सैतानाच्या ख्रिस्तावरील

द्वेषाचं मानवी स्वरूपात प्रकटिकरण होणे. आणि कारण ख्रिस्तच एकमेव जीवनदाता आहे, म्हणून अशा द्वेषाचा अंतिम परिणाम स्वतःचं विनाश हाच असतो.

## भ्रष्टतेकडे/विनाशाकडे नेणारा मार्ग

प्रेषित पौल आपल्याला रोमकरांस पत्रात या विनाश प्रक्रियेचे वर्णन देतो:

रोमकरांस पत्र *1:21-25* देवाला ओळखूनसुद्धा त्यांनी देव म्हणून त्याचा गौरव केला नाही किंवा त्याचे आभार मानले नाहीत*;* पण ते आपल्या कल्पनांनी शून्यवत झाले आणि त्यांचे निर्बुद्ध मन अंधकाराने भरून गेले. स्वतःला शहाणे म्हणता म्हणता ते मूर्ख बनले*;* आणि अविनाशी देवाच्या गौरवाची, नाशवंत मनुष्य, पक्षी, चतुष्पाद पशू व सरपटणारे प्राणी ह्यांच्या प्रतिमांच्या रूपांशी त्यांनी अदलाबदल केली. ह्यामुळे ते आपल्या मनाच्या वासनांत असताना देवाने त्यांना अशुद्धतेच्या स्वाधीन केले*;* असे की, त्यांच्या देहांची त्यांच्यात्यांच्यातच विटंबना व्हावी. त्यांनी देवाच्या खरेपणाची लबाडीशी अदलाबदल केली, आणि निर्माणकर्त्याऐवजी निर्मित वस्तूंची भक्ती व सेवा केली*;* तो निर्माणकर्ता तर युगानुयुग धन्यवादित आहे. आमेन. ह्या कारणांमुळे देवाने त्यांना दुर्वासनांच्या स्वाधीन केले*;* त्यांच्यातल्या स्त्रियांनी शरीराचा नैसर्गिक उपभोग सोडून विपरीत आचरण केले. तसेच पुरुषांनीही स्त्रियांचा नैसर्गिक उपभोग सोडून परस्परे कामसंतप्त होऊन पुरुषांनी पुरुषांबरोबर अनुचित कर्म केले आणि त्यांनी आपल्या भ्रांतीचे योग्य प्रतिफळ आपल्या ठायी भोगले. आणखी ज्या अर्थी देवाची जाणीव ठेवण्यास ते मान्य झाले नाहीत, त्या अर्थी देवाने त्यांना अनुचित कर्मे करण्यास विपरीत मनाच्या स्वाधीन केले.

भ्रष्टतेची प्रक्रिया त्या क्षणापासून सुरू होते, जेव्हा माणूस खऱ्या आणि स्वर्गीय देवाची महिमा करणे नाकारतो, आणि खोट्या उपासनेत अडकून आपल्या मनाला अंधारात ठेवतो. ही भ्रष्टता हळूहळू वाढत जाते, आणि माणसाच्या अंतर्मनात असलेली नैसर्गिक ख्रिस्तविरोधी वृत्ती कर्करोगासारखी पसरू लागते. या जगातील पहिल्या लोकांमध्ये, ही एक अशी साखळी सुरू झाली ज्यात देवाने त्यांना त्यांच्या इच्छित वागणुकीसाठी मोकळे सोडले. त्यांनी ख्रिस्ताने निर्माण केलेल्या व्यवस्थेविरुद्ध बंड करायचे ठरवले म्हणून देवाने त्यांना त्यांच्या अश्लील वासनांच्या ताब्यात दिले.

या प्रक्रियेचा शेवट असा होतो की देव त्या मनाला पूर्णपणे सोडून देतो—एक अशा मनाला, ज्याला आता जीवनाबद्दल काहीच वाटत नाही. मृत्यू आणि विनाश यांच्याबद्दल त्याला काहीही वाटत नाही. लैंगिक विकृती, हत्या आणि विध्वंस या

गोष्टी त्याच्या दृष्टीने सामान्य होतात. हेच "निकामी मन" असते. या सगळ्यात ख्रिस्त नाकारला जातो, त्याच्यावर तिरस्कार केला जातो, आणि त्याच्या आत्म्याला यातना दिल्या जातात. माणूस माणसावर जी हिंसा करतो, ती प्रत्यक्षात देवपुत्रावर असलेल्या त्यांच्या द्वेषाचेच प्रतिबिंब असते.

या प्रक्रियेत आपण पाहतो की जगाने स्वतःलाच नष्ट केले, कारण त्यांनी सैतानाच्या आत्म्याला पूर्णपणे राज्य करू दिले आणि त्याच्या ख्रिस्तविरोधी द्वेषाला आपले केले. आता उरलेली एकच गोष्ट म्हणजे – त्या निकामी मनाने निर्मात्याच्या नकारात पूर्णपणे प्रकट होणे. माणसाला पृथ्वीवर प्रभुत्व दिले गेले होते, म्हणून त्यांच्या अंतर्मनात पेरलेल्या अदृश्य बीजाचे फलप्रदर्शन पृथ्वीवर स्पष्ट होणारच होते—जसे आदामाच्या पापानंतर आलेले काटे. हाच काट्यांचा मुकुट आहे जो येशूने घातला होता, जो त्या वधस्तंभाचा भाग आहे जो तो वाहत होता.

आदामपूर्व काळ पूर्ण झाल्यावर, देवाने आपला पुत्र पाठवला की तो त्या स्त्रीकडून जन्माला यावा—ती स्त्री जिच्याकडे आदामापासून बीज होते. पण तसे झाले नाही. सैतानाच्या द्वेषपूर्ण प्रभावाखाली जगाने ख्रिस्ताला गर्भातच नष्ट केले. म्हणून जगाला त्याच्या मृत शरीराचे "गर्भपात" करून ते मानवी दुःखाच्या "शौचालयात" टाकावे लागले. पेत्राच्या शब्दांना आदामपूर्व वधस्तंभाच्या प्रकाशात पाहिल्यास नव्याने समज येते:

*1* पेत्र *3:18–20:* कारण आपल्याला देवाजवळ नेण्यासाठी ख्रिस्तानेही पापांबद्दल, म्हणजे नीतिमान पुरुषाने अनीतिमान लोकांकरता, एकदा मरण सोसले. तो देहरूपात जिवे मारला गेला आणि आत्म्यात जिवंत केला गेला; त्या आत्म्याच्या द्वारे त्याने जाऊन तुरुंगातील आत्म्यांना घोषणा केली. हे आत्मे म्हणजे पूर्वी नोहाच्या दिवसांत तारू तयार होत असता देव सहन करत वाट पाहत होता त्या वेळी ज्यांनी त्याची आज्ञा अवमानली तेच ते होत. त्या तारवात केवळ आठ जण पाण्यातून वाचवण्यात आले.

जसा ख्रिस्ताच्या मृत्यूवेळी निसर्गही साक्ष देतो (दुपारी सूर्य अंधारात गेला), तसाच तो आदामपूर्व वधस्तंभाचा साक्षीदार होता. त्या पडलेल्या स्त्रीचे पाणी पडणे, म्हणजे त्यांनी ख्रिस्ताला गर्भातच मारून टाकले होते,— कारण त्यांच्या अनैतिक आणि हिंसक वर्तनाने त्या बियाचं आयुष्य घुसमटून संपवलं होतं.

या पार्श्वभूमीत पाहिल्यास, नोहाच्या कथेला दयेचा संदेश म्हणून पाहणे शक्य होते.

“माणूस देवाने दयाळूपणे पाठवलेली चेतावणी बेधडकपणे नाकारू शकत नाही. नोहाच्या काळात आकाशातून एक संदेश जगाला पाठवण्यात आला होता, आणि त्यांच्या वाचण्या-मागे फक्त एकच आधार होता—ते या संदेशाला कशी वागणूक

देतात.” — *[GC 431]*

देवाने नोहामार्फत दिलेला संदेश कृपेचा होता — कारण तो विनाश म्हणजे त्यांच्या स्वतःच्या हातांनी ख्रिस्ताशी काय केलं त्याचं प्रतिबिंब होतं. ही संपूर्ण सृष्टी ख्रिस्तामध्येच टिकून आहे.

कलस्सै *1:17* तो सर्वांच्या पूर्वीचा आहे व त्याच्यामध्ये सर्वकाही अस्तित्वात आहे.

योहान *1:3* सर्वकाही त्याच्या द्वारे झाले*1* आणि जे काही झाले ते त्याच्यावाचून झाले नाही.

जसं एदेन बागेत आदामाने पाप केल्यावर ख्रिस्ताच्या दुःखांची साक्ष देण्यासाठी झाडांची पानं गळायला लागली, तसंच महाप्रलयात निर्माण झालेलं सृष्टीचं तडफडणं आणि वेदना ही पूर्वकालीन मानवांनी देवाच्या इशाऱ्यांना नाकारल्यामुळे आणि त्यांच्यातील हिंसेमुळे होती.

जर देवानेच त्या पूर्वकालीन मानवांना हिंसकपणे नष्ट केलं असतं, तर तो स्वतःच सैतानाचा आत्मा दाखवत असता. नोहाचा संदेश जबरदस्तीचा नव्हता; तो खंडणीसारखा नव्हता.

येशूने सांगितले:

मत्तय २४*:*३७ – नोहाच्या दिवसांत होते त्याप्रमाणे मनुष्याच्या पुत्राचे येणे होईल.

महाप्रलयाची कारणं, ह्या प्रेरणादायक शब्दांमधून बघा:

*"*कारण त्यांनी देवाचा इशारा नाकारला*,* आणि देवाचा आत्मा त्या पापी वंशातून मागे घेतला गेला*,* आणि म्हणूनच ते महाप्रलयाच्या पाण्यांमध्ये नष्ट झाले*."*

– ग्रेट कंट्रोव्हर्सी ४३१

"त्याच्या स्वतःच्या पापामुळे, आणि आबेलच्या मृत्यूमुळे व काईनाच्या नकारामुळे दुःखी झालेला आदाम दुःखाने कोसळला. त्याने पाहिलं की समाजामध्ये पसरलेली भ्रष्टता अखेरीस जगाचं महाप्रलयात नाश करणार आहे..."

– पेट्रियार्क्स अँड प्रॉफेट्स ८२

जगाच्या नाशाचं कारण म्हणजे ही माणसांच्या ख्रिस्तावरील द्वेष आणि हिंसक वृत्तीमुळे

पसरलेली भ्रष्टता होती. महाप्रलय हा त्यांच्या पापीपणावर पृथ्वीने दिलेला प्रतिसाद होता—जसं काटे आदामाच्या पापामुळे आले.

मत्तय ७:२ – कारण ज्या प्रकारे तुम्ही दोष काढाल त्या प्रकारेच तुमचे दोष काढण्यात येतील आणि ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला मापून देण्यात येईल.

स्तोत्र ७:१५ – त्याने खड्डा खणून खोल केला; आणि तोच त्या खड्ड्यात पडला.

सैतानाने मानवी वंशाला त्याच्या सृष्टीकर्त्याविरुद्ध बंड करायला प्रवृत्त केलं. त्यांच्या दररोजच्या स्वार्थी जीवनशैलीतून त्यांनी ख्रिस्ताला पुन्हा-पुन्हा वधस्तंभावर चढवलं. हेच ते कारण होते ज्यामुळे पृथ्वीवरून देवाचा आत्मा मागे घेतला गेला आणि महाप्रलय आला.

खालील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि त्यामागील क्रमवार विचारधारा समजून घ्या:

१. एलेन वाईट स्पष्टपणे सांगतात की नाश करणारा कोण आहे:

"सैतान हा नाश करणारा आहे." – 6T 388

२. देव सैतानाला त्याचं विनाशाचं कार्य करण्याची परवानगी कसा देतो ते समजावलं आहे:

"देव अशा लोकांना आशीर्वाद देऊ शकत नाही जे विश्वासू व्यवस्थापक असण्यास नकार देतात. तो फक्त सैतानाला त्याचं विनाशाचं कार्य करू देतो." – 6T 389

३. आज पृथ्वीवर सर्व प्रकारच्या आपत्ती का येतात, त्याचं कारण काय हेही स्पष्ट केलं आहे:

"आपल्याला सर्व प्रकारच्या आणि सर्व स्तरांतील आपत्ती पृथ्वीवर येताना दिसतात. आणि का? कारण प्रभूची प्रतिबंध करणारी शक्ती वापरली जात नाही. जगाने देवाच्या वचनाकडे दुर्लक्ष केलं आहे. ते अशा प्रकारे जगतात की जणू काही देव नाहीच." – 6T 389

४. नोहाच्या काळातील घटनांचा उदाहरण म्हणून वापर केला आहे:

"नोहाच्या काळातील लोकांसारखेच, हे लोकही देवाचा काहीच विचार करत नाहीत. दुष्टता अत्यंत प्रमाणात वाढलेली आहे आणि पृथ्वी आता शेवटच्या वेळेसाठी तयार

आहे." – 6T 389

येशू ख्रिस्त काल होता, आज आहे आणि पुढेही तसाच राहील. तो माणसांशी व्यवहार करण्याची आपली पद्धत बदलत नाही. हाच क्रम ग्रेट कंट्रोव्हर्सीमध्ये पुन्हा सांगितला आहे. यात बायबलमधील अनेक उदाहरणं देऊन ही प्रक्रिया स्पष्ट करण्यात आली आहे.

माणसाला देवाने दयाळूपणाने पाठवलेली सूचना नाकारण्याचा अधिकार आहे, पण त्याचे परिणाम टाळता येत नाहीत. नोहाच्या काळात स्वर्गातून जगासाठी एक संदेश पाठवला गेला होता, आणि त्या लोकांचे तारण त्या संदेशाला त्यांनी कसा प्रतिसाद दिला यावर अवलंबून होते. त्यांनी ती चेतावणी नाकारली म्हणूनच पवित्र आत्मा पापी लोकांपासून मागे घेतला गेला, आणि ते सर्व लोक महापुरात नष्ट झाले. अब्राहामच्या काळात, सदोमच्या दोषी रहिवाशांसाठी दयाही थांबली, आणि फक्त लोट, त्याची बायको आणि दोन मुली ह्यांच्या व्यतिरिक्त सर्वजण स्वर्गातून आलेल्या अग्नीत भस्मसात झाले. ख्रिस्ताच्या काळातसुद्धा हेच घडलं. देवपुत्राने त्या पिढीतल्या अविश्वासी यहूद्यांना सांगितलं, *"तुमचं घर ओसड पडेल." (मत्तय २३:३८)* जेव्हा प्रभूने शेवटच्या काळाकडे पाहिलं, तेव्हा त्याच असीम सामर्थ्याने हेही सांगितलं*:* त्यामुळे त्यांच्यासाठी सैतानाच्या कृतीप्रमाणे सर्व प्रकारची खोटी महत्कृत्ये, चिन्हे, अद्भुते आणि सर्व प्रकारचे अनीतिजनक कपट ह्यांनी युक्त असे त्या अनीतिमानाचे येणे होईल. त्यांनी असत्यावर विश्वास ठेवावा म्हणून देव त्यांच्या ठायी भ्रांतीचे कार्य चालेल असे करतो; ज्यांनी सत्यावर विश्वास ठेवला नाही, तर अनीतीत संतोष मानला त्या सर्वांना शासन व्हावे म्हणून असे होईल. *(२ थेस्सल २:१०-१२)* जेव्हा लोक देवाच्या वचनाच्या शिकवणी नाकारतात, तेव्हा तो आपला आत्मा मागे घेतो आणि मग त्यांना त्याच भ्रमात सोडतो, जे त्यांनी स्वतःहून स्वीकारले आहेत. *GC 431*

ही एक स्पष्ट आणि सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे**:**

1. देव दयाळूपणाने एक चेतावणी संदेश पाठवतो (कधीच जबरदस्तीने नाही).

2. जेव्हा तो संदेश पूर्णतः नाकारला जातो, तेव्हा देवाचा आत्मा मागे घेतो.

3. माणूस आपल्या पापांमध्ये एकटाच उरतो.

4. आणि मग त्यांना आपल्या निवडींचेच परिणाम भोगावे लागतात.

ही प्रक्रिया पुढील उदाहरणांमध्ये स्पष्ट दिसते**:**

1. नोहाच्या काळातील महापुरामुळे झालेला विनाश
2. सदोम नगराचा नाश
3. इस्राएलाने येशूला नाकारल्यामुळे यरुशलेमचा विनाश
4. आणि शेवटच्या काळातील विनाश

यरुशलेमच्या विनाशाच्या उदाहरणात आणखी स्पष्टता दिसते.

शत्रूंनी केलेल्या वेढा आणि त्यानंतरच्या संहारात लाखभराहून अधिक यहूदी मारले गेले*;* बरेच जण बंदी बनवले गेले, गुलाम म्हणून विकले गेले, विजयाचा सोहळा साजरा करण्यासाठी रोममध्ये नेले गेले, प्राण्यांसोबतच्या क्रूर खेळात फेकले गेले, किंवा जगभर विखुरले गेले. यहूद्यांनी स्वतःच आपले बंध तयार केले होते*;* त्यांनी स्वतःच आपला विरोधाचा प्याला भरला होता. त्यांच्या राष्ट्राच्या पूर्ण नाशात आणि त्यानंतर आलेल्या सर्व दुःखांमध्ये, त्यांनी आपल्याच कर्मांचं फळ भोगलं. भविष्यवक्ता म्हणतो*:* हे इस्राएला, जो मी तुझा साहाय्यकर्ता त्या माझ्यावर तू उलटलास, त्यामुळे तुझा नाश झाला*;* "तू आपल्या अधर्मामुळे ठोकर खाऊन पडला आहेस" *(*होशेय १३*:*९*; १४:१)* त्यानंतरची दु:खं ही देवाने थेट दिलेली शिक्षा म्हणून लोक पाहतात. पण खरे तर हा सैतानाचा धोका आहे. तो स्वतःचे कृत्य लपवण्यासाठी ही समजूत पसरवतो. देवाच्या प्रेम आणि दयेला त्यांनी सतत नाकारलं, म्हणूनच देवाने आपले संरक्षण काढून घेतले, आणि मग सैतानाला त्यांच्यावर पूर्णपणे सत्ता मिळवण्याची परवानगी मिळाली.

यरुशलेमच्या विनाशात झालेल्या कृत्यांतून सैतानाच्या क्रूर आणि सूडबुद्धीच्या सामर्थ्याचे दर्शन घडते—विशेषतः जेव्हा माणसं त्याच्या हातात पूर्णपणे सापडतात.

एलन व्हाईट यांना हे स्पष्ट दाखवण्यात आलं होतं:

*"*माझ्यावर हे उघड केलं गेलं की, देवाचे न्याय हे थेट देवाकडून येत नाहीत, पण खालीलप्रमाणे होतात*:* तो लोकांना वारंवार इशारा देतो, चूक दाखवतो, योग्य मार्ग दाखवतो. पण तरीही जर हे लोक, जे त्याच्या विशेष देखरेखीखाली होते, त्याचे वचन धुडकावून स्वतःचा मार्ग निवडतात, तर देव आपले दूत पाठवत नाही सैतानाला थांबवण्यासाठी. आणि मग सैतान त्यांच्यावर आपला संपूर्ण राग काढतो.*" (14MR 3)*

सैतान कसा काम करतो हे पुन्हा पाहा:

*"त्यांची दुःखं ही देवाने दिलेली शिक्षा आहे असं दाखवलं जातं. पण हेच सैतानाचं काम आहे – त्याने आपल्या कृत्यांचं खापर देवावर फोडून स्वतःला लपवून ठेवले आहे." (GC 35)*

खरं म्हणजे, सैतान निसर्गावर प्रयोग करतो – आणि जेव्हा त्याला परवानगी मिळते, तेव्हा त्याचा वापर विनाशासाठी करतो.

सैतान निसर्गातील घटकांचाही वापर करतो, जेणेकरून तो तयार नसलेल्या आत्म्यांचं पीक घेऊ शकेल. त्याने निसर्गाच्या रहस्यांचा खोल अभ्यास केला आहे, आणि देव ज्या मर्यादेपर्यंत परवानगी देतो, तिथपर्यंत तो आपली पूर्ण ताकद वापरून निसर्गावर नियंत्रण ठेवतो. जेव्हा त्याला ईयोबाला त्रास देण्याची मुभा दिली गेली, तेव्हा पाहता पाहता ईयोबाची जनावरे, नोकर, घरे, आणि मुलं एका मागोमाग एक नष्ट झाली — जणू एकच संकट दुसऱ्याच क्षणी दुसरं रूप धारण करत होतं. हे केवळ देवाचं संरक्षण आहे जे आपल्या सृष्टीचं रक्षण करतं आणि नाश करणाऱ्याच्या तावडीतून आपल्याला सुरक्षित ठेवतं. (GC 589)

'भविष्यवाणीचा आत्मा' स्पष्टपणे सांगतो की जे लोक मानतात की देवानेच महापुरामध्ये जग नष्ट केले, ते काईना सारख्या बंडखोर वृत्तीशी एकरूप झालेले असतात.

शिनारच्या मैदानातील लोकांनी देवाच्या करारावर विश्वास ठेवला नाही — की तो पुन्हा कधीही पृथ्वीवर पूर आणणार नाही. काही लोकांनी देवाच्या अस्तित्वालाच नाकारलं आणि महापूर नैसर्गिक कारणांमुळेच झाला असं मानलं. तर काहींना एक सर्वोच्च शक्ती असल्यावर विश्वास होता, पण त्यांना वाटत होतं की हाच देव होता ज्याने जग नष्ट केलं; आणि त्यांच्या अंत:करणात काईना सारखी बंडखोरी उसळली — आणि देवाविरुद्ध क्रोध निर्माण झाला. (PP 119)

आपण पाहतो की निसर्गशक्तींचा विनाशासाठी उपयोग सैतान करतो. पण महापुराची कथा थोडी वेगळी आहे, कारण त्या वेळेस सैतानचं निसर्गावर नियंत्रण नव्हतं.

वादळाच्या गर्जना आणि आक्रोशाच्या गोंगाट यांमध्ये, देवाच्या अधिकाराला नाकारलेल्या लोकांचा विलाप ऐकू येत होता. स्वतः सैतानही, जो या भयंकर निसर्गशक्तींच्या केंद्रात अडकलेला होता, आपल्या अस्तित्वाची भीती वाटून थरथर कापत होता. (PP 99)

भविष्यवाणीचा आत्मा "लढणाऱ्या शक्ती" (warring elements) ही संज्ञा सैतानी दूतांच्या कार्याशी जोडून वापरतो:

जेव्हा तुम्ही स्वतःला देवाशी योग्य संबंधात आणता, तेव्हा आणि जर तुम्हाला या लढणाऱ्या शक्तींमध्ये जावं लागलं—तरी ख्रिस्त तुमच्यासोबत आपला आत्मा देईल आणि तुमच्या प्रयत्नांना साथ देईल. जेव्हा तुम्ही अंधाराच्या शक्तींशी सामना करत असता, तेव्हा देवाचे देवदूत तुमच्या शेजारी असतील आणि माणसांच्या क्रोधापासून तुमचं रक्षण करतील. (RH, 29 जून 1886)

यरुशलेमच्या नाशाच्या वेळी एक गोष्ट विशेष होती — रोमन सेनापती टायटस मंदिराचं रक्षण करू इच्छित होता. पण त्याच्या सैन्यात एवढा गोंधळ माजला होता की, त्याच्याच हातून परिस्थिती सुटली आणि तो नियंत्रण हरवून बसला.

टायटस घटनास्थळी धावला, त्याच्या मागे त्याचे सेनापती आणि सैनिक होते. त्याने सैनिकांना जळत्या आगी विझवण्याचा आदेश दिला. पण त्याच्या शब्दांना कोणीही गांभीर्याने घेतलं नाही. आतुरतेने आणि संतापाने भरलेल्या सैनिकांनी मंदिराशेजारील खोल्यांमध्ये पेटते लाकडे फेकली, आणि मग तलवारींनी तिथे लपलेल्यांना मोठ्या संख्येने निर्दयपणे ठार केले. (GC 33)

सैतानने आपल्या सैन्यावरचं नियंत्रण गमावलं होतं का? त्याच्या सर्व लष्करांमध्ये भरलेली बंडखोरिचा आत्मा पूर्णपणे उघड झाला का?, ज्यातून केवळ नाश आणि गोंधळ प्रकट झाला! त्याचप्रमाणे, सैतान ज्या सृष्टीवर नियंत्रण ठेवू पाहत होता, ती सृष्टीही नियमाविरुद्ध झाली — आणि सैतानाचंच प्रतिबिंब दाखवू लागली की नाही?

यरुशलेमचा नाश आणि महापुराचा नाश यामधील मुख्य फरक म्हणजे — एकीकडे होती रोमन लष्कराची क्रूरता, आणि दुसरीकडे नैसर्गिक घटकांची बंधनमुक्त शक्ती (कदाचित वाईट देवदूतांचं बंधनमुक्त कार्यही). रोमन सैनिक सैतानाच्या नियंत्रणाखाली होते आणि त्यांनी यरुशलेम नष्ट केले — हे पाहणं तुलनेत सोपं आहे. पण जेव्हा निसर्ग स्वतःच सैतानाच्या हिंसक तत्त्वांचं प्रतिबिंब दाखवू लागतो — किंवा त्याचे अनुयायीच तसे वागू लागतात — तेव्हा गोष्टी अधिक गुंतागुंतीच्या वाटतात. महापुराच्या वेळी सैतान निसर्गावर नियंत्रण ठेवू शकत नव्हता. पण निसर्गाला परवानगी दिली गेली की तो सैतानासारखा वागू शकतो — म्हणजे ख्रिस्ताचं नाही, तर सैतानाचं स्वरूप दाखवू शकतो. ख्रिस्त सर्व गोष्टी शिस्तबद्धपणे आणि सुव्यवस्थेने करतो; तर सैतानाचं स्वरूप असतं गोंधळयुक्त, विनाशपूर्ण, आणि हिंसक. सैतानाचा आत्मा सतत संघर्षशील असतो, आणि त्या आत्म्याला कधी कधी निसर्गात प्रकट होऊ दिलं जातं. हीच घटना आपण ख्रिस्ताच्या पुनरागमनाच्या वेळीही पाहतो:

आणि आता मानवी वेदनेचा एक असाहाय्य आक्रोश उसळतो. "क्रुसावर खिळा! क्रुसावर खिळा!" — यरुशलेमच्या रस्त्यांमध्ये घुमणाऱ्या त्या घोषणेपेक्षा अधिक तीव्र, भयभीत आणि निराशांनी भरलेला विलाप ऐकू येतो: "तोच देवाचा पुत्र आहे! तोच खरा

मशीहा आहे!" ते राजाधिराजाच्या उपस्थितीतून पळण्याचा प्रयत्न करतात. पृथ्वीचे खोल गुफा, जे वादळासारख्या शक्तींनी तुटून गेले आहेत, तिथे ते व्यर्थपणे लपण्याच्या प्रयत्न करतात. (GC 643.4)

एखादा माणूस हिंसक व विनाशक पद्धतीने वागतो तेव्हा आपण सहजपणे म्हणतो की तो सैतानाच्या प्रभावाखाली आहे. पण जेव्हा निसर्गच अशा वृत्तीचं प्रतिबिंब दाखवतो, तेव्हा आपण सहज त्या गोष्टीचं श्रेय देवालाच देतो. पण आपला पिता — देव — असा विनाशक, गोंधळलेला नाही. जेव्हा निसर्ग विस्कळीत होतो, तेव्हा त्यामागचं कारण हे असतं — की सृष्टीच्या निर्मात्याला पूर्णपणे आणि कायमचं तिथून बाहेर हाकललं गेलं आहे. देवाने माणसाला पृथ्वीवर प्रभुत्व दिलं होतं.

स्तोत्र 8:4-6: मर्त्य मनुष्य तो काय की तू त्याची आठवण करावी? मानव तो काय की तू त्याला दर्शन द्यावे? तू त्याला देवापेक्षा1 किंचित कमी असे केले आहेस; त्याला गौरव व थोरवी ह्यांनी मुकुटमंडित केले आहेस. तू त्याला आपल्या हातच्या कृत्यांवरचे प्रभुत्व दिले आहेस, तू सर्वकाही त्याच्या पायांखाली ठेवले आहेस.

जेव्हा ख्रिस्ताला पूर्णपणे नाकारलं जातं, तेव्हा देवाने माणसाला दिलेलं प्रभुत्व — आता या पृथ्वीवरील रहिवाशांनी ज्या व्यक्तीची निवड केली आहे, त्याच्या मनाचं आणि आत्म्याचं प्रतिबिंब दाखवू लागतं. एखाद्या वडिलांनी आपल्या मुलाला एक गाडी दिली — आणि तो मुलगा जर उतावळी आणि गोंधळलेल्या वृत्तीच्या मित्रांमध्ये राहत असेल आणि मग त्या गाडीचा एक अपघात होतो आणि त्या मुलाचा मृत्यू झाला, तर वडिलांनाच दोष दिला जाईल काय?

## मृत्यू पापामुळे होतो, देवामुळे नाही

सुरुवातीपासून हे असंच होत आलं आहे. देवाने आदामाला बागेत स्पष्ट सांगितलं होतं:

उत्पत्ती २:१७ – पण बऱ्यावाइटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको; कारण ज्या दिवशी त्याचे फळ तू खाशील त्या दिवशी तू खास मरशील.

आपल्याला अगदी स्पष्टपणे सांगितलं आहे की त्या मृत्यूचं कारण काय होतं:

रोमकरांस ६:२३ – कारण पापाचे वेतन मरण आहे.

बऱ्यावाइटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाण्याचा अर्थ असा होता की आता आदामाने स्वतः ठरवेल काय चांगलं आणि काय वाईट. त्याने असा अंदाज घेतला की

देवापेक्षा त्याला स्वतःच्या भल्यासाठी काय योग्य आहे हे जास्त ठाऊक आहे. अशी वृत्ती एक ठराविक पद्धतीने काम करते:

याकोब १:१४-१५ – तर प्रत्येक माणूस आपल्या वासनेने ओढला जातो व भुलवला जातो तेव्हा मोहात पडतो. मग वासना गर्भवती होऊन पापाला जन्म देते; आणि पाप परिपक्व झाल्यावर मरणास उपजवते.

प्रलोभनातून वासना निर्माण होते, वासनांतून पाप, आणि पापातून मृत्यू. देव हा पापाचा निर्माता नाही, त्यामुळे तो पापाची मजुरी देऊच शकत नाही. जर देवच पापाची शिक्षा देत असेल, तर त्याच्यावर जबरदस्तीचा आरोप ठेवता येईल. हे असं होईल जणू कोणी म्हणतोय: “जर तू माझी उपासना केली नाहीस, तर मी तुला आणि तुझ्या कुटुंबाला ठार मारीन.”

पाप म्हणजे नेमकं काय?

रोमकरांस १४:२३ – जे काही विश्वासाने नाही ते पाप आहे.

१ योहान ३:४ – जो कोणी पाप करतो तो स्वैराचार करतो; कारण पाप स्वैराचार आहे.

मग, कायदा म्हणजे काय?

रोमकरांस ७:१२ – तरीपण नियमशास्त्र पवित्र आहे, आणि आज्ञा पवित्र, यथान्याय व उत्तम आहे.

मग देव म्हणजे काय?

१. पवित्र: “तुम्ही पवित्र असावे, कारण मी परमेश्वर तुमचा देव पवित्र आहे.” – लेवीय १९:२

२. न्यायी: “तो न्यायी व सरळ आहे.” – अनुवाद ३२:४

३. चांगला: “मला उत्तम का म्हणतोस? एकावाचून म्हणजे देवावाचून कोणी उत्तम नाही." – लूक १८:१९

जर देव आणि त्याचा कायदा हे दोन्ही पवित्र, न्याय्य आणि चांगले असतील, तर कायदा देवाशी संबंधित कसा आहे?

देवाचा कायदा हा त्याच्या स्वभावाचं प्रतिबिंब आहे. तो त्याच्या राज्यातील तत्त्वांचा आराखडा आहे. – Christ’s Object Lessons (COL) ३०६

देव आपल्या मुलांकडून परिपूर्णतेची अपेक्षा करतो. त्याचा कायदा हा त्याच्याच स्वभावाचं प्रतिबिंब आहे, आणि तो त्याच्या सर्व चरित्रांचं मापन करण्याचा निकष आहे. – COL ३१५

तुला देवाच्या आज्ञा पाळायला आवडतं का? कारण त्या आज्ञा म्हणजे देवाचे आदेश आहेत – त्या त्याच्या स्वभावाचं प्रतिबिंब आहेत – आणि त्या जशा आहेत तशाच राहतात, कारण देवाचा स्वभावही अचल आणि बदलत नाही. (FLB) १३०

# ख्रिस्त पित्याच्या स्वभावाचं परिपूर्ण प्रकटीकरण आहे

कोण आहे तो ज्याने देवाच्या स्वभावाचं प्रतिबिंब असलेला कायदा परिपूर्ण रीतीने जगाला दाखवून दिला?

ख्रिस्ताचं पृथ्वीवरचं जीवन हे देवाच्या कायद्याचं परिपूर्ण प्रकटीकरण होतं – Christ's Object Lessons (COL) ३१५

ख्रिस्ताने स्वतःबद्दल काय म्हटलं होतं?

योहान १४:९ – येशूने त्याला म्हटले : "फिलिप्पा, मी इतका काळ तुमच्याजवळ असूनही तू मला ओळखत नाहीस काय? ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे; तर 'आम्हांला पिता दाखवा' असे तू कसे म्हणतोस?

कायदा आपल्याला काय सांगतो?

निर्गम २०:१३ – "खून करू नकोस." [हिब्रू H7523 – तुकडे करणे, नष्ट करणे]

ख्रिस्ताने पित्याच्या कायद्याचं परिपूर्ण प्रतिबिंब दाखवलं का?

लूक ९:५६ – "कारण मनुष्याचा पुत्र मनुष्यांच्या जीवाचा नाश करायला नाही, तर त्यांना तारायला आला आहे."

मत्तय २६:५२ – तेव्हा येशू त्याला म्हणाला, "तुझी तलवार परत जागच्या जागी घाल, कारण तलवार धरणारे सर्व जण तलवारीने नाश पावतील.

लूक ६:२७-२८ – जेव्हा सर्व लोक तुम्हांला बरे म्हणतील तेव्हा तुमची केवढी दुर्दशा होणार! त्यांचे पूर्वज खोट्या संदेष्ट्यांना असेच म्हणत असत. परंतु तुम्हा ऐकणाऱ्यांस मी सांगतो, तुम्ही आपल्या वैऱ्यांवर प्रीती करा; जे तुमचा द्वेष करतात त्यांचे बरे करा;

मत्तय ५:३९-४० – मी तर तुम्हांला सांगतो, दुष्टाला अडवू नका. जो कोणी तुझ्या उजव्या गालावर मारतो, त्याच्याकडे दुसरा गाल कर; जो तुझ्यावर फिर्याद करून तुझी बंडी घेऊ

पाहतो त्याला तुझा अंगरखाही घेऊ दे;

लूक २३:३४ – तेव्हा येशू म्हणाला, “हे बापा, त्यांना क्षमा कर; कारण ते काय करतात हे त्यांना समजत नाही.”

जर ख्रिस्त हा पित्याचं परिपूर्ण प्रतिबिंब असेल, आणि ख्रिस्ताचं पृथ्वीवरचं सेवाकर्म देखील देवाच्या कायद्याचं परिपूर्ण प्रकटीकरण असेल, आणि तो कायदाही देवाच्या स्वभावाचं प्रतिबिंब असेल – तर मग, "खून करू नकोस" हे देव म्हणतो, कारण तो स्वतःही हत्त्या करत नाही. याउलट जर देव हत्त्या करत असेल, तर मग तो परूशी लोकांसारखा ठरतो:

मत्तय २३:२-३ – शास्त्री व परूशी हे मोशेच्या आसनावर बसले आहेत; म्हणून ते जे काही तुम्हांला सांगतील ते सर्व आचरत व पाळत जा; परंतु त्यांच्या कृतीप्रमाणे आचरण करू नका; कारण ते सांगतात पण तसे आचरण करत नाहीत.

मग असा प्रश्न पडतो की: देव जे बोलतो ते करतो का? एकाच झऱ्यातून गोड आणि कडवट पाणी एकाच वेळी येऊ शकते का? तो आपल्याला ‘खून करू नकोस’ असं सांगतो आणि मग स्वतः अब्जावधी लोकांचा नाश करतो असे का? जर असं असेल, तर तोच विश्वातील सर्वांत मोठा नाशकर्ता ठरेल. पण येशूने कधीच कोणाची हत्या केली नाही, आणि येशूच आपल्या पित्याचं परिपूर्ण प्रतिबिंब आहे, आणि त्याचा स्वभाव कायद्यात स्पष्टपणे उमटलेला आहे — जो सांगतो: ‘खून करू नकोस.’ "पवित्र व्हा, कारण मी पवित्र आहे." हिंसेपासून मुक्त व्हा, कारण मीही हिंसेपासून मुक्त आहे." जेव्हा यशया ख्रिस्ताबद्दल बोलतो, तेव्हा तो म्हणतो:

यशया 53:9 – त्याची कबर दुर्जनांच्या कबरांमध्ये नेमली होती आणि तो मेल्यावर धनवंताची कबर त्याला प्राप्त झाली; तथापि त्याने काही अधर्म केला नव्हता, त्याच्या मुखात काही कपट नव्हते.
ख्रिस्ताने कधीच कोणतीही हिंसा केली नाही. ख्रिस्त हा आपल्या पित्याचं परिपूर्ण प्रतिबिंब आहे. म्हणूनच, पित्यानेही कधीच हिंसा केली नाही. त्याच्यावर जे आरोप लाखो ख्रिस्ती लोकांनी लावले आहेत, त्या सर्वांपासून तो निर्दोष आहे.

रोमकरांस ३:३-६ – कित्येकांनी विश्वास ठेवला नाही म्हणून काय झाले? त्यांचा अविश्वास देवाची विश्वासपात्रता व्यर्थ करील काय? कधीच नाही! देव खरा आणि

प्रत्येक मनुष्य खोटा ठरो; शास्त्रातही लिहिलेले आहे की, “तू आपल्या वचनात नीतिमान ठरावेस, आणि तुझा न्याय होत असता तुला जय मिळावा.” पण आपल्या अनीतीमुळे जर देवाचे नीतिमत्त्व स्थापित होते, तर ह्यावरून आपण काय म्हणावे? देव जो क्रोधाने शासन करतो तो अनीतिमान आहे, असे म्हणावे की काय? (मी हे मानवी व्यवहाराप्रमाणे बोलत आहे.) कधीच नाही! असे झाले तर देव जगाचा न्याय कसा करील?

मग देव सूड कसा घेतो?

रोमकरांस १२:१९-२१ – प्रिय जनहो, सूड उगवू नका, तर देवाच्या क्रोधाला वाट द्या; कारण असा शास्त्रलेख आहे की, “सूड घेणे माझ्याकडे आहे, मी फेड करीन,” असे प्रभू म्हणतो. उलटपक्षी, “तुझा शत्रू भुकेला असल्यास त्याला खायला दे; तान्हेला असल्यास त्याला प्यायला दे; कारण असे केल्याने तू त्याच्या मस्तकावर निखाऱ्यांची रास करशील.” वाइटाने जिंकला जाऊ नकोस, तर बऱ्याने वाइटाला जिंक.

देवाचे विचार आपल्यासारखे नाहीत. देवाचा सूड घेण्याचा मार्गही आपल्या मार्गासारखा नाही. यातूनच आपल्याला देवाच्या स्वभावाचं खरे रूप कळतं. प्रत्येक भाग काळजीपूर्वक वाचा — कारण हे पित्याचं पूर्ण प्रकटीकरण आहे.

निर्गम ३४:६-७ – परमेश्वर त्याच्यापुढून अशी घोषणा करीत गेला: “परमेश्वर, परमेश्वर, दयाळू, कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर, हजारो जणांवर दया करणारा, अन्याय, अपराध व पाप यांची क्षमा करणारा, पण अपराधी जनांची मुळीच गय न करणारा, असा तो वडिलांच्या दुष्टाईबद्दल पुत्रपौत्रांचा तिसऱ्या व चौथ्या पिढीपर्यंतही समाचार घेतो.”

स्तोत्र १०७:१ – परमेश्वराचे उपकारस्मरण करा, कारण तो चांगला आहे; आणि त्याची दया सनातन आहे.

देव नेहमीच दयाळू आणि स्वातंत्र्यप्रिय आहे. म्हणूनच तो माणसांना त्यांच्या कृतींचे परिणाम अनुभवू देतो. तो त्यांच्या पापांचे फळ त्यांच्याच डोक्यावर येऊ देतो. माणूस जसं पेरतो, तसंच तो कापतो.

# मृत्यूची भीती निर्माण करणारा महान खोटा विश्वास

सैतानाने आदामला दिलेल्या देवाच्या पहिल्याच आज्ञेचा अर्थच बदलून टाकला. देवाने आदामला सांगितले होते की, जर त्याने स्वतःच्या बुध्दीने चांगलं-वाईट ठरवायचं ठरवलं, तर त्याचं स्वतःचंच नुकसान होईल. पण जेव्हा आदामने फळ खाल्लं, तेव्हा सैतानाने त्याला असा विचार दिला की देव आता तुला मारायला येईल. देवाचे शब्द हे खरंतर करुणेचे होते – पण सैतानाने त्यांचा अर्थ जबरदस्ती आणि भीती दाखवणाऱ्या देवासारखा दाखवला.

उत्पत्ती *3:9-10* – तेव्हा परमेश्वर देवाने आदामाला हाक मारून म्हटले, *"*तू कोठे आहेस*?"* तो म्हणाला, *"*मी बागेत तुझा आवाज ऐकला, तेव्हा मी नग्न आहे म्हणून भिऊन लपलो.*"*

सैतानाने देवाचे चित्र असे रंगवले, की जणू देव जबरदस्ती आणि मृत्यूची भीती वापरून आदामावर नियंत्रण ठेवत होता.

ही कल्पना इतकी प्रभावी ठरली की आदामने जेव्हा सैतानाचे खोटे ऐकले, तेव्हा त्याच्या मनात देवाचा स्वभाव बदलला – आता तो एक असा देव वाटू लागला जो मृत्यूच्या भीतीने माणसावर नियंत्रण ठेवतो. आदाम देवाला एक 'मारणारा' म्हणून घाबरू लागला, आणि हीच खरी गुलामी होती.

हीच गुलामी मोडण्यासाठी ख्रिस्त पृथ्वीवर आला.

इब्री *2:14-15* – ज्या अर्थी ‘मुले’ एकाच रक्तमांसाची होती त्या अर्थी तोही त्यांच्यासारखा रक्तमांसाचा झाला, हेतू हा की, मरणावर सत्ता गाजवणारा म्हणजे सैतान, ह्याला मरणाने शून्यवत करावे, आणि जे मरणाच्या भयाने आयुष्यभर दास्याच्या बंधनात होते त्या सर्वांना मुक्त करावे*.*

लूक *1:71-74* – म्हणजे आपल्या ‘शत्रूंच्या’ व आपला ‘द्‌वेष करणाऱ्या’ सर्वांच्या ‘हातून’ सुटका करावी*;* अशासाठी की, ‘आपल्या पूर्वजांवर’ त्याने ‘दया’ करावी, आणि त्याने ‘आपला’ पवित्र ‘करार’, म्हणजे जी शपथ आपला पूर्वज ‘अब्राहाम ह्याच्याशी त्याने वाहिली’, ती ‘स्मरावी,’ ती अशी की, तुम्ही आपल्या शत्रूंच्या हातून सुटून

मग शत्रूंपासून खरी सुटका कशी होते?

*1* योहान *4:18* – प्रीतीच्या ठायी भीती नसते*;* इतकेच नव्हे तर पूर्ण प्रीती भीती घालवून देते*;* भीतीमध्ये शासन आहे आणि भीती बाळगणारा प्रीतीमध्ये पूर्ण झालेला नाही.

ही भीती नेमकी कोणती आहे?

इब्री *2:15* – मरणाच्या भयाने आयुष्यभर दास्याच्या बंधनात होते

ही भीती पहिल्यांदा कुठून आली?

उत्पत्ती *3:9-10* – *"*मी बागेत तुझा आवाज ऐकला*,* तेव्हा मी नग्न आहे म्हणून भिऊन लपलो*."*

आदाम नेमका कशाला घाबरला? त्याच्या संततीकडूनच आपण समजून घेऊया:

निर्गम *17:3* – पण तेथे लोकांना खूप तहान लागली आणि ते कुरकुर करून मोशेला म्हणाले*, "*आम्हांला*,* आमच्या मुलांना व आमच्या गुराढोरांना तहानेने मारून टाकायला तू आम्हांला मिसर देशातून बाहेर का आणलेस*?"*

गणना *14:2-3* – सर्व इस्राएल लोक मोशे आणि अहरोन ह्यांच्याविरुद्ध कुरकुर करू लागले*;* सर्व मंडळी त्यांना म्हणाली*, "*आम्ही मिसर देशात मेलो असतो तर बरे झाले असते किंवा ह्याच रानात मेलो असतो तरी बरे झाले असते. तलवारीने आमचा निःपात व्हावा म्हणून परमेश्वर आम्हांला ह्या देशात का नेत आहे*?* आमच्या बायकामुलांची लूट होईल*!* आम्ही मिसर देशात परत जावे हेच बरे नव्हे काय*?"*

गणना *21:5* – ते परमेश्वराविरुद्ध व मोशेविरुद्ध असे बोलू लागले की*, "*तुम्ही आम्हांला मिसर देशातून काढून ह्या रानात मरायला कशाला आणले*?* येथे तर अन्न नाही व पाणीही नाही*,* आणि ह्या हलक्या अन्नाला आम्ही कंटाळलो आहोत*."*

इस्राएली लोकांनी वाळवंटात का प्राण गमावले? कारण त्यांना वाटत होतं की देव त्यांना मारू इच्छित आहे. आणि ही चुकीची कल्पना कुठून आली? सैतानाकडून – ज्याने ती आदाम आणि हवेला दिली. ही कल्पना – की देव आपल्याला मारू इच्छितो – ही सगळ्यात मोठी, क्रूर, आणि विध्वंसक खोटी गोष्ट आहे जी सैतानाने देवाच्या कोमळ, प्रेमळ, आणि दयाळू स्वरूपाबद्दल पसरवली. ही भीती माणसाला गुलामीत ठेवते – कारण भीतीतून बंडखोरी होते, बंडखोरीतून पाप येते, आणि पापातून मृत्यू.

# ख्रिस्ताने मृत्यू रद्द केला आहे

म्हणूनच येशूने आपल्या पित्याकडे विनंती केली, की तो या जगात यावा आणि माणसांना मृत्यूच्या प्रक्रियेबद्दल दाखवून द्यावे. ख्रिस्त हे उघड करणार होता की सैतान अंधारात लपून देवावर खोटे आरोप करत आहे. तो देवाला 'नाश करणारा' ठरवत आहे आणि आपले स्वतःचे वाईट काम झाकत आहे.

पण मग, ख्रिस्ताच्या मृत्यूतून हे कसं सिद्ध होतं की देव खून करणारा नाही?

- परूशांनी येशूचा मृत्यू मागावा, ही प्रेरणा देवाने दिली नव्हती — ती सैतानाने दिली होती.
- शिष्य झोपले, कारण देवाने तसं केलं नव्हतं — सैतानाने त्यांच्या मनात सुस्ती आणली होती.
- यहूदाने येशूला फसवलं, ते देवामुळे नव्हे — सैतानाच्या प्रभावामुळे.
- शिष्य पळून गेले, कारण सैतानाने त्यांच्यात भीती भरली होती — त्यामागे देव नव्हता.
- परूशांना येशूला क्रुसावर चढवण्याची प्रेरणा देवाने दिली नव्हती — ती सैतानाची प्रेरणा होती.
- सैतानाने लोकांच्या आवाजातून पिलातावर दबाव टाकला, त्या गर्दीत देव नव्हता.
- लोकांनी येशूला मारलं, त्याच्यावर थुंकलं, दाढी ओढली — हे सैतानाने घडवलं.
- सैतानाने प्रेरित करून रोमन सैनिकांनी त्याला क्रुसावर ठोकलं — देवाने नाही.

या सगळ्या गोष्टींमध्येही, देवाला हे थांबवता आलं असतं. तो आपल्या पुत्राला वाचवू शकला असता. पण ख्रिस्त स्वतः म्हणतो:

योहान *10:17-18* मी आपला प्राण परत घेण्याकरता देतो म्हणून पिता माझ्यावर प्रीती करतो. कोणी तो माझ्यापासून घेत नाही*,* तर मी होऊनच तो देतो. मला तो देण्याचा अधिकार आहे व तो परत घेण्याचाही अधिकार आहे. ही आज्ञा मला माझ्या पित्यापासून प्राप्त झाली आहे.*"*

ख्रिस्ताने स्वतः विनंती केली म्हणूनच पित्याने त्याला परवानगी दिली — जेणेकरून तो संपूर्ण विश्वाला दाखवू शकेल की मृत्यू खरोखर कोणापासून येतो. ख्रिस्ताचा क्रूसावरील मृत्यू हे दाखवतो की पापच मृत्यूचं खरं कारण आहे — देव नाही.

येशूला कधीही खात्री नव्हती की तो पुन्हा जिवंत होईल. त्याला वाटलं की पाप इतकं घृणास्पद आहे की देव आणि त्याच्यातली ही फट कदाचित कायमचीच झाली आहे. त्याने ते दुःख अनुभवलं जे एक दिवस प्रत्येक पाप अनुभवेल — जेव्हा दयेच दारं कायमची बंद होतील. त्याने पापाची तीव्रता, देवाची रागावलेली उपस्थिती आणि माणसांकरिता घेतलेलं हे दुखाचं ओझं इतकं खोल अनुभवलं की त्याचं हृदय अक्षरशः तुटून गेलं. *– DA 753.2 (Desire of Ages)*

पापामुळे देव आणि त्याच्या पुत्रामध्ये अंतर पडले. देवाचा कोप म्हणजे त्याने पाठ फिरवणे होय. देवाचा कोप ही एक विलक्षण क्रिया आहे—पाप्यापासून दूर होणे आणि त्याला त्याच्या स्वतःच्या निर्णयांनुसार जाऊ देणे.

यशया *28:21:* जसा परासीम डोंगरामध्ये परमेश्वर उभा राहिला होता, जसा तो गिबोन दरीत रागावला होता त्याप्रमाणे तो रागावेल. अशासाठी की त्याने आपले कार्य, त्याचे अद्भूत कृत्य आणि त्याचे विस्मयकारी कृत्य करावे.

यहेज्केल *7:22:* मी आपले तोंड त्यांच्यापासून फिरवीन म्हणजे ते लोक माझे भांडार भ्रष्ट करतील; लुटारू त्यात शिरून ते भ्रष्ट करतील.

स्तोत्र *31:17-18:* हे परमेश्वरा, मला लज्जित होऊ देऊ नकोस; कारण मी तुझा धावा केला आहे; दुर्जन लज्जित होवोत, ते अधोलोकात निःशब्द राहोत. नीतिमानाविरुद्ध गर्वाने, तिरस्काराने व उद्दामपणाने बोलणाऱ्यांची वाचा बंद पडो.

स्तोत्र *27:9:* तू आपले मुख माझ्या दृष्टिआड करू नकोस आपल्या सेवकाला रागाने दूर घालवू नकोस. तू माझे साहाय्य होत आला आहेस; हे माझ्या उद्धारक देवा, माझा त्याग करू नकोस, मला सोडू नकोस.

मीखा *3:4:* तेव्हा ते परमेश्वराला आरोळी मारतील तरी तो त्यांचे ऐकणार नाही; तो त्या वेळेस त्यांना पराङ्मुख होईल, कारण त्यांनी दुष्कृत्ये केली आहेत.

कृपया “God’s Strange Act” हे पुस्तिकेचे वाचन करा, ज्यात देवाच्या कोपाविषयी अधिक समज दिलेली आहे.

आपण जेव्हा देवाला नाकारतो, तेव्हा तो आपलं तोंड फिरवतो. हाच पापाचा खरा परिणाम आहे. जेव्हा आपले पापं—खास करून देवाला नाकारणं—हे सर्व येशूवर ठेवले गेले, तेव्हा देवाने आपलं तोंड फिरवलं. आणि मग येशू अशा वेळी आक्रोश करत म्हणाला:

मत्तय *27:46:* आणि सुमारे नवव्या तासाला येशू मोठ्याने आरोळी मारून बोलला, “एली, एली, लमा सबख्थनी,” म्हणजे “माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?”

देवाने आपल्या पुत्राचा त्याग का केला? हे दाखवण्यासाठी की पापाशी तो कसा वागतो—विशेषतः जेव्हा मनुष्य त्याला नाकारतो. देव कोणालाही जबरदस्तीने स्वतःकडे वळवत नाही. तो शेवटी माणसाच्या इच्छेचा आदर करतो. तो कुठलाही हिंसात्मक शिक्षा करणारा देव नाही. देवाने येशूला क्रूसावर शारीरिक अग्नीने भस्म केलं नाही, वीज पडवून त्याला ठेचून टाकलं नाही, किंवा आपटून ठार केलं नाही. याउलट, पापी माणसाने देवाला नाकारलं आणि त्याचं असणं नकोसं केलं—त्या निवडीचा आदर करत देव बाजूला झाला.

यशया *53:3-5:* तुच्छ मानलेला, मनुष्यांनी टाकलेला, क्लेशांनी व्यापलेला व व्याधींशी परिचित असलेला असा तो पुरुष पाहून लोक तोंडे फिरवत व त्याला तुच्छ लेखत*;* आणि त्याला आम्ही मानले नाही. खरोखर आमचे व्याधी त्याने आपल्यावर घेतले*,* आमचे क्लेश त्याने वाहिले*;* तरी त्याला ताडन केलेले*,* देवाने त्याच्यावर प्रहार केलेले व त्याला पिडलेले असे आम्ही त्याला लेखले. खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला*,* आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला*;* आम्हांला शांती देणारी अशी शिक्षा त्याला झाली*;* त्याला बसलेल्या फटक्यांनी आम्हांला आरोग्य प्राप्त झाले.

क्रूसावर येशूने मानवी इच्छेचं ओझं वाहिलं होतं. त्याने आपल्यावर घेतलेली गोष्ट म्हणजे देवाला नाकारणं. मृत्यूचे खरी स्वरूप काय आहे हे दाखवण्यासाठी, देवाने ती मानवी नकारात्मक इच्छा मान्य केली आणि तो बाजूला झाला. येशूने जणू देवाची परवानगी घेतली—"हे दाखवण्यासाठी की मृत्यू कसा येतो—तो देवामुळे नव्हे, तर पापामुळे येतो."

जेव्हा येशू मोठ्याने ओरडून म्हणाला, "पूर्ण झाले!" आणि आपला आत्मा पित्याच्या हातात दिला, तेव्हा मृत्यूचं खरं स्वरूप उघड झालं. सैतान आणि त्याचे दूत खऱ्या स्वरूपात जगासमोर आले. जे प्रश्न देवाच्या स्वभावाविषयी चांगल्या देवदूतांच्या मनात होते, ते सारे मिटले. सैतान जणू वीजेसारखा स्वर्गातून खाली फेकला गेला.

लूक *10:18:* तेव्हा त्याने त्यांना म्हटले*,* "सैतान आकाशातून विजेसारखा पडला हे मी पाहिले.

*2* तीमथ्य *1:9-10:* त्याने आमच्या कृत्यांप्रमाणे नव्हे तर स्वत*:*च्या संकल्पाप्रमाणे व कृपेप्रमाणे आम्हांला तारले व पवित्र पाचारणाने पाचारले आहे*;* ही कृपा युगांच्या काळापूर्वी ख्रिस्त येशूच्या ठायी आपल्यावर करण्यात आली होती*;* ती आता आपला तारणारा येशूख्रिस्त ह्याच्या प्रकट होण्याने दृश्यमान झाली आहे. त्याने मरण नाहीसे केले*,* आणि सुवार्तेच्या द्वारे जीवन व अविनाशिता ही प्रकाशित केली आहेत.

जग निर्माण होण्याच्या अगोदरपासूनच, देव आणि त्याच्या पुत्राने ठरवलं होतं की मृत्यूचं खरं स्वरूप दाखवायचं आणि ते पापाशी कसं संबंधित आहे ते उघड करायचं. जेव्हा येशू क्रूसावर मरण पावला, तेव्हा मृत्यूचे खरं स्वरूप उघड झाले—आणि त्यामुळे मृत्यूचे सामर्थ्य नष्ट झाले.

रोमकरांस १६:२५–२६ आता जे रहस्य गतयुगात गुप्त ठेवले होते, परंतु आता जे प्रकट झाले आहे आणि सर्व राष्ट्रांतील लोकांनी विश्वासाच्या अधीन व्हावे म्हणून सनातन देवाच्या आज्ञेने संदेष्ट्यांच्या लेखांच्या द्वारे त्यांना जे कळवण्यात आले आहे, त्या रहस्याच्या प्रकटीकरणाला अनुसरूनच माझ्या सुवार्तेप्रमाणे व येशू ख्रिस्ताविषयीच्या घोषणेप्रमाणे तुम्हांला स्थिर करण्यास समर्थ असा जो एकच ज्ञानी देव, त्याला येशू ख्रिस्ताच्या द्वारे युगानुयुग गौरव असो. आमेन.

योहान १२:३२–३३ आणि मला पृथ्वीपासून उंच केले तर मी सर्वांना माझ्याकडे आकर्षून घेईन." आपण कोणत्या मरणाने मरणार हे सुचवण्याकरता तो असे बोलला.

याचा अर्थ असा होतो की ख्रिस्ताने आपल्या मृत्यूद्वारे एक मोठा खोटा विश्वास नष्ट केला — की देव लोकांना ठार मारतो. खरं तर मृत्यूची खरी शक्ती ही सैतानाच्या या खोट्या विचारात आहे की, जो कोणी देवाच्या विरोधात जातो, त्याला देव शिक्षा देऊन मारतो.

इब्री २:१४ ज्या अर्थी 'मुले' एकाच रक्तमांसाची होती त्या अर्थी तोही त्यांच्यासारखा रक्तमांसाचा झाला, हेतू हा की, मरणावर सत्ता गाजवणारा म्हणजे सैतान, ह्याला मरणाने शून्यवत करावे.

ख्रिस्ताने त्या खोट्या समजुतीला उघड केलं की, आदामाला देवाने दिलेली चेतावणी म्हणजे त्याला ठार मारण्याची धमकी होती. म्हणूनच क्रूस आपल्याला खरे स्वातंत्र्य देतो — त्या भीतीपासून की देव आपल्याला मारेल. ख्रिस्ताच्या मृत्यूतून आपण पाहतो की पित्याने आपला पुत्र ठार मारलेला नाही, तर मानवाच्या नकाराची इच्छा ख्रिस्ताने स्वतःवर घेतली आणि देवाने ती इच्छा मान्य करून आपल्या पुत्राचा त्याग केला.

शेवटल्या न्यायाच्या दिवशी, प्रत्येक हरवलेला आत्मा समजून घेईल की त्याने सत्य नाकारले आणि देवाच्या प्रेमाचा अपमान केला. त्या दिवशी क्रूस पुन्हा एकदा प्रत्येकासमोर उभा केला जाईल, आणि जो कुणी पापामुळे अंध झाला होता, त्याला खरं सत्य दिसेल. कळकळीच्या त्या रहस्यमय वधस्तंभापुढे प्रत्येक पापी स्वतःला दोषी ठरवेल. कुठलीही सबब, कुठलाही बहाणा टिकणार नाही. मानवी बंडखोरी आणि देवाला नाकारणं किती गंभीर होतं हे स्पष्ट दिसेल. लोकांना आपल्या निर्णयाचं खरं स्वरूप समजेल. सत्य आणि खोटेपणा यामधल्या दीर्घकालीन संघर्षाचं चित्र पूर्णपणे स्पष्ट होईल. (DA 58)

क्रूस आपल्याला जीवन आणि सार्वकालिक जीवनाचे खरे स्वरूप दाखवतो. तो उघड करतो की देव मृत्यूचा निर्माता नाही, आणि सैतान सुरुवातीपासूनच खोटारडा आणि खुनी आहे.

पण जर ख्रिस्ताने मृत्यूची सत्ता आधीच नष्ट केली आहे, तर लोक अजूनही का मरतात? कारण अजूनही बरेच लोक त्या खोट्यावर विश्वास ठेवतात की देव त्यांच्या पापांमुळे त्यांना मारतो. जेव्हा एखादा माणूस सतत या विचाराकडे बघतो, तेव्हा तो त्या खोट्याच्या प्रतिमेसारखा होतो. आणि मग त्याला देवाचं प्रत्येक कृपायुक्त आमंत्रण देखील एक प्रकारची धमकी वाटते — की जर आपण ते स्वीकारलं नाही, तर देव आपल्याला शिक्षा देईल.

म्हणून, आपण क्रूसाकडे पाहूया आणि समजून घेऊया की ख्रिस्ताने सर्व मानवजातीसाठी मृत्यू नष्ट केला आहे — पुरुष, स्त्रिया, आणि लहान मुले सगळ्यांसाठी. त्याने सर्प उंचावर उभा करून दाखवला. त्याने हे स्पष्ट केलं की देव म्हणजे प्रेम आहे — आणि त्याच्यामध्ये किंचितही अंधार नाही. तेव्हा आपण ख्रिस्ताच्या या वचनाचा अर्थ समजू शकतो:

मत्तय ९:२४ "वाट सोडा, कारण मुलगी मेली नाही; ती झोपेत आहे." तेव्हा ते त्याला हसू लागले.

सैतान आजही स्वतःला लपवतो — या जगात जे काही विनाशकारक घडते, त्यामागे तो स्वतः असतो, पण लोकांना वाटतं की देवच हे सगळं करत आहे. जेव्हा आपण असा विश्वास ठेवतो की देवच नाश करतो, तेव्हा आपल्यात भीती निर्माण होते — आणि तीच भीती आपल्याला गुलाम बनवते. जोपर्यंत सुवार्ता अशी शिकवली जाते की देव जरुरी पडल्यास ठार मारतो, तोपर्यंत लोकांच्या मनात ती कृपा नाही, ती धमकी वाटते. मृत्यूची भीती आपल्याला देवाच्या हातात पूर्णपणे विसावू देत नाही. अशा परिस्थितीत, देवाच्या कृपेची हाक सुद्धा एक लपलेली धमकी वाटते — जस की जर तू नाही वळलास, तर देव तुला मारून टाकेल.

# पित्याच्या प्रेमाचे प्रकटीकरण

बायबल आपल्याला स्पष्ट सांगते की आपली सुटका आपल्याकडून घडणाऱ्या कृतींवर अवलंबून नाही. उधळ्या पुत्राच्या गोष्टीत आपण पाहतो की वडिलांनी त्याला परत स्वीकारले ते त्याने काहीतरी चांगले केलं म्हणून नव्हे, तर तो त्यांचा मुलगा होता म्हणून. 'आपली ओळख' या पुस्तकाचा मुख्य संदेश हाच आहे—आपण देवासाठी मौल्यवान आहोत कारण आपण त्याची मुले आहोत, कारण आपण त्याने सांगितलेले काहीतरी केलं म्हणून नाही. आपली कृती किंवा अपयश देवाच्या प्रेमात किंवा आमच्या किंमतीमध्ये काहीही बदल घडवू शकत नाही.

मत्तय ३:१७ — आणि पाहा, आकाशातून अशी वाणी झाली की, "हा माझा 'पुत्र', मला 'परमप्रिय आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे."'

इफिस १:६ — त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून हे झाले. ही कृपा त्याने आपल्यावर त्या प्रियकराच्या ठायी विपुलतेने केली आहे.

ज्या क्षणी येशूने यार्देन नदीत बाप्तिस्मा घेतला, तेव्हा देवाने त्याच्याबद्दल जे शब्द उच्चारले—"हा माझा परमप्रिय पुत्र आहे, ह्यांच्याविषयी मी संतुष्ट आहे"—हे शब्द केवळ येशूसाठी नव्हते. ते पूर्ण मानवजातीसाठी होते. देवाने येशूसोबत ज्या प्रेमाने संवाद साधला, त्याच प्रेमाने तो आपल्याशीही बोलतो. आपल्याकडे कमतरता आणि पाप असलं, तरी तो आपल्याला दूर ढकलत नाही. "त्याने आपल्याला त्या प्रियकरामध्ये स्वीकारले आहे." (इफिस १:६). येशूवर जो गौरव उतरला होता, तो देवाच्या आपल्या प्रेमाची हमी आहे. (DA 113)

जर आपण खरोखरच विश्वास ठेवतो की आपण ख्रिस्तामध्ये स्वीकारले गेलो आहोत, आपल्या धार्मिकतेमुळे नव्हे तर कारण देव हा प्रेम आहे म्हणून —तर मग आपण मान्य करायला हवे की देवाच्या दृष्टीने आपण नेहमीच मौल्यवान आहोत.

'ओळख' या संदेशाचा स्वाभाविक निष्कर्ष असा आहे की जर आपल्या आयुष्यातील मूल्य हे आपल्या पित्याशी असलेल्या नात्यावर आधारित असेल, तर मग काहीही झाले तरी देवाच्या दृष्टीने आपण मौल्यवानच राहतो. त्यामुळे देव कधीच आपली नासधूस करणार नाही. पण जर आपण असे मानले की दुष्ट लोकांना देव स्वतःच नष्ट करतो, तर मग आपण हे अप्रत्यक्षपणे मानतो की आपण आता देवासाठी मूल्यहिन झालो आहोत. अशा प्रकारचा विश्वास हे सूचित करतो की जर एखादा व्यक्ती देवाचे ऐकत नाही, तर देव त्याला नष्ट करतो कारण तो आता काही कामाचा राहिला नाही.

आपणसुद्धा, जर एखाद्या व्यक्तीत अजून काहीतरी चांगुलपणा किंवा मूल्य पाहात

असू, तर आपण त्या व्यक्तीला सोडून देत नाही. मग देव त्याचप्रमाणे कस करेल? देव आपली मुले कधीच सोडून देत नाही. तो त्यांना त्यांच्या स्वतःच्या निवडीप्रमाणे अनुभव देतो.

नीतिसूत्रे ८:३६ — परंतु जो मला अंतरतो तो आपल्या जिवाची हानी करून घेतो; जे माझा द्वेष करतात त्या सर्वांना मरण प्रिय आहे.”

ख्रिस्ताने मृत्यूचा नाश केला—ही कृती त्याने या जगाच्या निर्मितीपासूनच केली होती, पण ती पूर्णपणे क्रूसावरच उघड झाली. मिसरामधील संकटे, जलप्रलय, सदोम-गोमोरा इत्यादी घटनांमध्ये आपण वधस्तंभाची सावली पाहतो. पण क्रूसावर हे सत्य स्पष्ट आणि पूर्णपणे प्रकट झाले. क्रूसानंतर कोणीही असा दावा करू शकत नाही की देव मृत्यूचा निर्माता आहे. आता कोणीही अशी समजूत ठेवू शकत नाही की देव जेव्हा एखाद्याला नकारतो, तेव्हा त्याला ठार करतो. जर कोणी अजूनही असे मानत असेल की देव वाईट लोकांना ठार करतो, तर ते ख्रिस्ताच्या मृत्यूचा अर्थ नाकारत आहेत. ते अजूनही भीतीद्वारे लोकांना सुधारण्याचा मार्गच योग्य मानत आहेत.

“बलपूर्वक कृती देवाच्या राज्याच्या तत्त्वांशी विसंगत आहे. देव केवळ प्रेमाने प्रेरित होणारी सेवा स्वीकारतो; प्रेम आदेश देऊन मिळवता येत नाही; प्रेम केवळ प्रेमाद्वारेच जागृत होतं. देवाला समजून घेणं म्हणजे त्याच्यावर प्रेम करणं—म्हणूनच देवाच्या स्वभावाचं प्रकटीकरण आवश्यक होतं. सैतानाच्या खोट्या स्वभावाच्या विरोधात हे स्पष्ट व्हायला हवं होतं. आणि हे काम केवळ एकच व्यक्ती करू शकला—जो देवाच्या प्रेमाची खोली व उंची जाणून होता.” (DA 22.1)

ख्रिस्ताच्या "पंखांतील उपचार" याचा अर्थ असा आहे की त्याने मृत्यूबाबत असलेली चुकीची समज नष्ट केली. त्याने हे सिद्ध केलं की देव आपल्या शत्रूंना ठार करत नाही. हा खोटा विश्वास—की देव आपल्या शत्रूंना संपवतो—हा सैतानालाच "पंख" देतो. त्यावर आधारितच त्याने भीतीने भरलेलं एक राज्य उभारलं. पण जेव्हा ख्रिस्ताने क्रूसावर मृत्यू स्वीकारला आणि दाखवलं की मृत्यू कश्यामुळे होतो, तेव्हा सैतानाचे पंख छाटले गेले आणि तो पृथ्वीवर फेकला गेला. जे ख्रिस्ताकडे पाहतात, ते त्याच्यासोबत त्याच्या उपचारांच्या पंखांवर उचलले जातील, आणि पृथ्वीवरच्या उंच ठिकाणी चालतील.

जेव्हा देवाने सापाला शिक्षा दिली की तो आपलं पोट जमिनीवर रगडत चालेल आणि धूळ खाईल, तेव्हा त्याने सैतानाच्या राज्याचा अंत जाहीर केला—ते  राज्य जे या खोट्या समजुतीवर आधारित होतं की देव आपल्या प्रजेला भीतीद्वारे वश करतो.

# जलप्रलयाद्वारे कालवरी प्रकट झाली.

जेव्हा परमेश्वराने जगातील दुष्टपणाकडे पाहिले, तेव्हा त्याने सूचित केले की यासाठी एक मर्यादा असेल.

उत्पत्ती ६:३ — तेव्हा परमेश्वर म्हणाला, *"मनुष्य भ्रांत झाल्यामुळे माझ्या आत्म्याची त्याच्या ठायी सर्वकाळ सत्ता राहणार नाही; तो देहधारी आहे; तथापि मी त्याला एकशे वीस वर्षांचा काळ देईन."*

ही मर्यादा म्हणजे देवाचा आत्मा मनुष्यांशी त्यांच्या उद्धारासाठी किती काळ झगडत राहील, याचा कालावधी. ख्रिस्ताचा आत्मा त्याच्या भरकटलेल्या मुलांसोबत रात्रंदिवस विनवण्या करत होता. तो त्यांना दररोज जवळ बोलावत होता, त्यांच्याशी संवाद साधत होता. पण मग आपल्याला वाचायला मिळते की त्यांनी त्या आत्म्याच्या आग्रहाला कसा प्रतिसाद दिला:

रोमकरांस १:१८ — वास्तविक जी माणसे अनीतीने सत्य दाबून ठेवतात त्यांच्या अभक्तीवर व अनीतीवर देवाचा क्रोध स्वर्गातून प्रकट होतो.

जलप्रलयापूर्व लोक त्यांच्या अंतःकरणातील विवेकाचा आवाज दबावत होते. त्यांनी दररोज त्या सौम्य आणि प्रेमळ आत्म्याच्या आवाजाकडे कानाडोळा केला आणि दुष्टतेच्या मार्गावर धावतच राहिले. ख्रिस्ताच्या आत्म्याला त्यांनी जणू दबवून टाकण्याचा प्रयत्न केला — त्याला खाली धरून ठेवले, जणू त्याला बुडवण्याचा प्रयत्न केला. दिवसोदिवस त्याचा आत्मा त्रासला जात होता, आणि ख्रिस्ताला अनेक वेळा त्याला दुःखाने पछाडल्यासारखे वाटत होते.

यशया ६३:१० — तरी त्यांनी बंड केले व त्याच्या पवित्र आत्म्यास खिन्न केले; तेव्हा तो उलटला व त्यांचा शत्रू बनला, तो स्वतः त्यांच्याशी लढला.

जसं-जसं लोक विनाशाच्या जवळ जात होते, तसं ख्रिस्ताची विनवणी अधिक तीव्र होत होती. पण त्यांनी त्याचा आवाज शत्रूचा आवाज समजला. त्यांच्यावर ख्रिस्ताने दिलेली साक्ष ते तिरस्काराने आणि उपहासाने नाकारत होते.

स्तोत्र ६:३-८ — माझा जीव अगदी घाबरा झाला आहे; हे परमेश्वरा, हे कोठवर चालणार? हे परमेश्वरा, माझ्याकडे वळ, माझा जीव वाचव, तू आपल्या वात्सल्यानुसार मला तार; कारण मृतावस्थेत तुझे स्मरण कोणाला राहत नाही; अधोलोकात तुझे उपकारस्मरण कोण करणार? मी कण्हून कण्हून थकलो आहे, रोज रात्री मी आपले अंथरूण आसवांत पोहवतो; मी आपला पलंग अश्रूंनी विरघळवतो. शोकाने माझी दृष्टी

मंद झाली आहे; माझ्या सर्व शत्रूंमुळे माझे नेत्र क्षीण झाले आहेत. अहो दुष्कर्म्यांनो, तुम्ही सर्व माझ्यापुढून निघून जा, कारण परमेश्वराने माझे रडणे ऐकले आहे.

ख्रिस्ताच्या वेदना लपवता येण्यासारख्या नव्हत्या. जर मानवांनी ख्रिस्ताचा क्रूस नाकारला, तर मग निर्जीव धोंडेही त्याच्या दुःखाची साक्ष देतील. कारण ख्रिस्त हा या सृष्टीचा निर्माता आहे, आणि म्हणून संपूर्ण सृष्टी त्याच्या वेदनांवर प्रतिसाद देते.

रोमकरांस ८:२२ — कारण आपल्याला ठाऊक आहे की सबंध सृष्टी आजपर्यंत कण्हत आहे व वेदना भोगत आहे.

स्वर्गदूत अचंबित होऊन त्या तारणकर्त्याच्या निराशा व वेदनेच्या प्रसंगाकडे पाहत होते. स्वर्गातील देवदूतांनी त्यांच्या चेहऱ्यावर पडदे टाकले कारण त्या भीषण दृश्याकडे पाहणे त्यांना सहन झाले नाही. सृष्टीने तिच्या अपमानित तारणार्याबद्दल वेदना व्यक्त केल्या. सूर्याने त्या दृश्याकडे पाहणं नाकारलं. त्याचे तेजस्वी किरण दुपारी पृथ्वीवर प्रकाश टाकत होते, पण अचानक त्या तेजावर अंधार दाटून आला. एका गडद चादरीसारखा अंधार संपूर्ण प्रदेशावर पसरला. "नवव्या प्रहरापर्यंत संपूर्ण भूमीवर अंधार होता." हा अंधार सूर्यग्रहणामुळे नव्हता, किंवा कोणत्याही नैसर्गिक घटनेमुळे आलेला नव्हता. तो अंधार इतका खोल होता, जणू चंद्र-ताऱ्यांशिवायची काळी मध्यरात्र खाली उतरली होती. *(DA 753)*

ख्रिस्ताच्या दुःखांवर निसर्गाने दिलेला प्रतिसाद काळजीपूर्वक लक्षात घ्या. हे समजून घेणंही तितकंच महत्त्वाचं आहे की हा प्रतिसाद कोणत्याही नैसर्गिक कारणामुळे नव्हता—तर तो त्यांचा निर्मात्याची हत्या झाल्यामुळे होता.

पुन्हा एकदा हे लक्षात ठेवणं गरजेचं आहे: निर्जीव निसर्गाने अपमानित व मृत्युपंथाला लागलेल्या आपल्या निर्मात्याबद्दल वेदना व्यक्त केली… हा अंधार सूर्यग्रहणामुळे किंवा इतर कोणत्याही नैसर्गिक कारणामुळे आलेला नव्हता. (DA 753)

स्तोत्र १८ ख्रिस्ताच्या क्रूसावरील दुःखांची एक झलक दाखवतो—महापुराच्या पार्श्वभूमीवर.

स्तोत्र. १८:४–५ — मृत्यूच्या बंधनांनी मला वेष्टिले, नाशाच्या पुरांनी मला घाबरे केले. अधोलोकाच्या बंधनांनी मला घेरले, मृत्यूचे पाश माझ्यावर आले.

भविष्याचा आत्मा आपल्याला सांगतो की, स्तोत्र १८ ही ख्रिस्ताच्या क्रूसावरील मृत्युची एक भविष्यवाणी आहे.

"ख्रिस्त हा लोकांनी नाकारलेला, तुच्छ लेखलेला, दुःखाचा पुरूष होता आणि त्याला वेदनांचा अनुभव होता. दुष्ट हातांनी त्याला पकडलं आणि क्रूसावर ठेवलं. त्याच्या

मृत्यूविषयी बोलताना स्तोत्रकार म्हणतो — मृत्यूच्या वेदनांनी मला वेढलं, नाशाच्या पुरांनी मला घाबरे केले. अधोलोकाच्या वेदनांनी मला घेरलं; मृत्यूच्या सापळ्यांनी मला रोखलं." (Review and Herald, १७ जुलै, १९००, परिच्छेद ११)

स्तोत्र १८ मधील काही वर्णनं महापुराच्या संदर्भात आहेत, तर काही अग्नीच्या भाषेत बोलतात—जी सदोम व गोमोराच्या नाशाची आठवण करून देतात आणि शेवटच्या काळातील दुष्टांच्या विनाशाचाही सूचन करतात. जेव्हा ख्रिस्त लोकांना त्यांच्या दुष्टपणापासून वळवण्याचा प्रयत्न करत होता, तेव्हा तो त्यांच्या वाईट वर्तनाच्या पुरामुळे पूर्णपणे व्याकुळ झाला.

उत्पत्ती ६:६ — म्हणून मानव पृथ्वीवर उत्पन्न केल्याचा परमेश्वराला अनुताप झाला आणि त्याच्या चित्ताला खेद झाला.

जलप्रलयापुर्वीच्या लोकांनी ख्रिस्ताला उघड लाजिरवाणं केलं. त्यांच्या पापी वर्तनामुळे त्याचा आत्मा सतत वेदनांनी भरला होता. शेवटी, त्या काळातील क्रूसावर त्याने अतिदुःखाने ओरडले — "मला तहान लागली आहे!" पवित्र आत्म्याने मग मनुष्यांची विनवणं करणं थांबवलं. शेकडो वर्षे विनवण्या करूनही नकार दिला गेल्यानंतर, शेवटी त्याने त्यांच्या निर्णयाला मान्यता दिली.

कारण त्यांनी वारंवार दिलेले इशारे नाकारले, त्या पापी मानवजातीपासून देवाचा आत्मा काढून घेतला गेला, आणि ते महापुरात नष्ट झाले. *(The Great Controversy, पृष्ठ ४३१)*

निर्जीव निसर्गालाही शुभवर्तमान (सुसमाचार) सांगण्यापासून रोखता आलं नाही — विशेषतः महापूराच्या घटनेद्वारे. खालील उताऱ्यांमध्ये महापुराच्या कथेला आणि ख्रिस्ताच्या वधस्तंभाला जोडणारे संदर्भ पाहा:

१. हाक मारणे

स्तोत्र १८:६ — मी आपल्या संकटात परमेश्वराचा धावा केला, माझ्या देवाला मी हाक मारली; त्याने आपल्या मंदिरातून माझी वाणी ऐकली, माझी हाक त्याच्या कानी गेली.

मत्तय २७:४६ — आणि सुमारे नवव्या तासाला येशू मोठ्याने आरोळी मारून बोलला, “एली, एली, लमा सबख्थनी,” म्हणजे “माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?”

२. पृथ्वी हादरणे

स्तोत्र १८:७ — तेव्हा पृथ्वी हादरली व कंपित झाली, पर्वताचे पाये डळमळले, त्यांना

झोके बसले, कारण तो संतप्त झाला होता. [दुःखी होता]

मत्तय २७:५१ — तेव्हा पाहा, पवित्रस्थानातील पडदा वरपासून खालपर्यंत फाटून दुभागला, भूमी कापली, खडक फुटले;

३. अंधार

स्तोत्र १८:९ — आकाश लववून तो खाली उतरला; त्याच्या पायांखाली निबिड अंधकार होता.

स्तोत्र १८:११ — त्याने आपणाला काळोखाने आच्छादून घेतले, त्याने आपणाला आकाशातील मेघमय अंधाराचा, दाट ढगांचा मंडप केला.

मत्तय २७:४५ — मग दुपारी सहाव्या तासापासून नवव्या तासापर्यंत देशभर अंधार पडला.

"आकाश अधिकाधिक काळोखमय होत गेलं आणि पावसाच्या सरी अधिक वेगाने कोसळू लागल्या." (Patriarchs and Prophets, पृष्ठ ९९)

४. पाण्याचे मार्ग आणि पृथ्वीचा पाया उघड होणे

स्तोत्र १८:१५ — तेव्हा हे परमेश्वरा, तुझ्या धमकीने, तुझ्या नाकपुड्यांतील श्वासाच्या सोसाट्याने जलाशयाचे तळ दिसू लागले, पृथ्वीचे पाये उघडे पडले.

"आकाशातून मोठ्या प्रचंड लाटा कोसळू लागले. नद्या त्यांच्या काठांबाहेर वाहू लागल्या आणि त्यांनी खोल दऱ्या भरून टाकल्या. जमिनीखालून पाण्याचे झरे अशक्य अशा शक्तीने बाहेर पडू लागले, आणि त्यांनी प्रचंड खडक हवेत उडवून दिले, जे पुन्हा पृथ्वीवर पडून खोल गाडले गेले." (Patriarchs and Prophets, पृष्ठ ९९.१)

उत्पत्ती ७:११ — नोहाच्या वयाच्या सहाशेव्या वर्षी दुसऱ्या महिन्याच्या सतराव्या दिवशी महाजलाशयाचे सर्व झरे फुटले आणि आकाशाची दारे उघडली.

५. दुःखाचा आक्रोश

स्तोत्र २२:१ — माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास? माझा दुःखाचा आक्रोश ऐकून माझा बचाव करण्यास तू जवळ नाहीस.

"माणसांच्या आणि जनावरांच्या मनातील भीती समोर होती. वादळाच्या गर्जनेच्या पलीकडे, त्या लोकांचा आक्रोश ऐकू येत होता ज्यांनी देवाच्या अधिकाराला तुच्छ लेखलं होतं." (Patriarchs and Prophets, पृष्ठ ९९)

६. तारण

स्तोत्र १८:१६ — त्याने वरून हात लांब करून मला धरले, आणि मोठ्या जलाशयातून मला बाहेर काढले.

उत्पत्ती ८:१–३ — मग देवाने नोहा व तारवात त्याच्याबरोबर असलेले वनपशू आणि ग्रामपशू ह्या सर्वांची आठवण केली; देवाने पृथ्वीवर वारा वाहवला तेव्हा पाणी ओसरू लागले; जलाशयाचे झरे व आकाशाची दारे बंद झाली, आणि आकाशातून पावसाची झोड थांबली, पृथ्वीवरचे पाणी एकसारखे हटत गेले; दीडशे दिवस संपल्यावर पाणी ओसरत गेले.

निसर्गाने साक्ष दिली की त्याच्या निर्मात्यासोबत काय घडलं होतं. जसा ख्रिस्त प्रत्येक माणसाला प्रकाश देणारा आहे, तसाच त्याचा दुःखाचा अनुभव — जलप्रलयात नष्ट झालेल्या सर्व लोकांच्या जीवनांतही प्रकट झाला.

स्तोत्र ३३:६–७ — परमेश्वराच्या शब्दाने आकाश निर्माण झाले; त्याच्या मुखश्वासाने आकाशातील सर्व सैन्य निर्माण झाले. तो समुद्राची जले राशीसारखी एकवट करतो; महासागराचे निधी साठवतो.

ख्रिस्ताच्या सामर्थ्यानेच आकाश निर्माण झाले. त्याचं वचन संपूर्ण सृष्टीमध्ये बोलत राहते. ख्रिस्ताच्या वचनानेच समुद्रातील पाणी एकत्र गोळा केलं गेलं आणि पृथ्वीच्या गर्भात साठवून ठेवण्यात आलं. पण जेव्हा पूर्व काळातील लोकांनी अखेरीस पूर्णपणे ख्रिस्ताला नाकारलं, तेव्हा त्याचा शांत, प्रेमळ आवाज थांबला. आणि मग, जो सामर्थ्य या पाण्यांना त्यांच्या जागी धरून ठेवत होता, तो तुटून गेला — कारण सृष्टी आता विनाशकतेच्या तत्त्वांमध्ये सोपवण्यात आली होती.

या पाण्यांच्या सुटकेमागे सैतान नव्हता, पण जेव्हा ख्रिस्ताला इतकं छळण्यात आलं की त्याला अखेरीस त्याचा आत्मा सोडावा लागला, तेव्हा सृष्टीने ह्या जगाच्या अधिपतीचा शांत करणारा आवाज ऐकणं थांबवलं — जो नेहमी म्हणायचा, “शांत हो, स्थिर हो.” त्यामुळे मग पाण्यांनी सैतान आणि दुष्ट माणसांच्या अंतःकरणातली अस्वस्थता आणि अस्थैर्य प्रतिबिंबित केले. ह्याचा अनुभव सैतानालाही घ्यावा लागला. कारण ख्रिस्ताच्या क्रूसावरील बलिदानाची भीषणता त्या महाप्रलयातील पाण्यांत उलगडून दाखवली गेली. खोल पाण्यांचे झरे फुटणे हे ख्रिस्ताच्या तुटलेल्या हृदयाचं दृश्य होतं. आकाशातून कोसळणारं पाणी म्हणजे त्याने आदामाच्या पतित संततीसाठी वाहवलेले अश्रू होते. पूर्व काळातील लोकांनी ख्रिस्ताच्या दुःखाला मान्यता दिली नाही, पण निसर्गाने मात्र आपला निर्माता जो दुःख भोगत होता त्याच्या वेदनांची साक्ष दिली आणि त्याच्या शोक व मृत्यूचं प्रतिबिंब स्वतःमध्ये उमटवलं. सैतानाने या विनाशाला कारणीभूत ठरवून पूर्व लोकांना ख्रिस्त व त्याच्या आत्म्याला नाकारायला लावलं. आणि जेव्हा त्यांनी पूर्णपणे नकार दिला, तेव्हा निसर्गाने त्या नकाराला साक्ष दिली — आणि त्याच वेळी गोंधळणाऱ्या आत्म्याचा ठसा देखील प्रकट केला.

## देवाने प्रहार केलेला व पिडलेला असे आम्ही त्याला लेखले

जेव्हा आपण जलप्रलयाच्या गोष्टीत वधस्तंभाचे प्रकटीकरण पाहतो, तेव्हा न्यायाविषयी आपल्या मानवी दृष्टिकोनाला एक खोल व अर्थपूर्ण समज मिळते.

यशया ५३:३-४ तुच्छ मानलेला, मनुष्यांनी टाकलेला, क्लेशांनी व्यापलेला व व्याधींशी परिचित असलेला असा तो पुरुष पाहून लोक तोंडे फिरवत व त्याला तुच्छ लेखत; आणि त्याला आम्ही मानले नाही. खरोखर आमचे व्याधी त्याने आपल्यावर घेतले, आमचे क्लेश त्याने वाहिले; तरी त्याला ताडन केलेले, देवाने त्याच्यावर प्रहार केलेले व त्याला पिडलेले असे आम्ही त्याला लेखले.

जिथे कुठे वधस्तंभाचे सत्य उघड केलं जाते, तिथेच आपले नैसर्गिक मानवी हृदय हे समजते की हे कार्य जणू देवाने शिक्षा दिल्याचं आहे. बायबल जलप्रलयामध्ये वधस्तंभाचे प्रकटीकरण अगदी स्पष्टपणे दर्शवते, आणि तरीसुद्धा आपण हे समजतो की तो विनाश म्हणजे देवाचा कोप होता. महापुरात जी लोकं नष्ट झाली, त्यांच्यामध्ये ख्रिस्ताच्या मृत्यूचं प्रकटीकरण झालं होतं. पण तरीही आपली नैसर्गिक प्रतिक्रिया हीच असते – "देवाने प्रहार केलेले व पिडलेले" हीच प्रतिक्रिया वधस्तंभाच्या सत्यावर अंधार टाकते, आणि त्या विनाशामागचं खरं कारण लपवते.

यशया ५३:५ खरे पाहिले असता तो आमच्या अपराधांमुळे घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला; आम्हांला शांती देणारी अशी शिक्षा त्याला झाली; त्याला बसलेल्या फटक्यांनी आम्हांला आरोग्य प्राप्त झाले.

खरं कारण म्हणजे आपले अपराध. ख्रिस्ताच्या वधस्तंभाचा हेतू हेच दर्शवतं की मानवाच्या पापामुळे, त्याच्या विद्रोही आणि सैतान प्रेरित स्वभावामुळेच महापूर आला. जेव्हा आपण म्हणतो की "देवाने महापूर घडवून आणला आणि लोकांना ठार केलं," तेव्हा आपण पुन्हा एकदा तोच दुःखद विचार पुन्हा व्यक्त करतो – "त्याला देवाने प्रहार केलेले व पिडलेले असे आम्ही त्याला लेखले"

## आपल्या पूर्ण मनाने पित्याचा शोध घेणे

आणखी खोल जाऊन आपण असा प्रश्न विचारू शकतो की: "देवाच्या पुत्राने स्वतःचा आवाज मागे घेतल्यामुळे, ज्याने पूर्वी पाण्यांना धरून ठेवलं होतं, तो आवाज थांबवल्यामुळेच तर प्रलयात लोक मरले नाहीत काय?" त्याचा आवाज आता थांबवण्यात आला होता आणि त्याने लोकांच्या निर्णयाला स्वीकार दिला होता. जर तुम्ही एका माणसाला गोळ्या घालून मारता, जो धरणातल्या भिंतीतील भेगेवर बोट ठेवून पाणी बाहेर येण्यापासून रोखतोय, आणि मग पाणी धरण फोडून वाहायला लागतं – तर खरं सांगायचं झालं, हे पाणी कोणी सोडले? त्याने त्यांना सतत इशारे दिले, एक नौका बांधली, त्यांच्याशी विनवण्या केल्या आणि त्यांना वारंवार सांगितलं की सृष्टी त्याच्या दुःखाचा आरसा होईल. ज्या वेळी ख्रिस्त जगाच्या पापांचे ओझे घेऊन वधस्तंभावर होता, त्याच वेळी निसर्गही माणसाच्या पापी, अस्ताव्यस्त मनोवृत्तीचा भार सोसत होता आणि ह्याच अवस्थेतुन जात होता. ख्रिस्ताचं शरीर क्रुसावर पूर्णपणे छिन्नविछिन्न, अत्याचारांनी भरलेलं होतं आणि प्रलयाच्या वेळी निसर्गही या गोंधळाच्या भाराखाली होता.

पवित्र आत्म्याच्या करुणामय आणि कोमल आवाजाने त्यांना किती वेळा पश्चात्तापाकडे बोलावलं होतं! तो आवाज एखाद्या मित्राच्या, भावाच्या, तारणाऱ्याच्या हृदयस्पर्शी विनवणीतून किती वेळा ऐकू आला होता. त्याच्या कृपेचा नकार देणाऱ्यांसाठी, तोच आवाज आता अत्यंत निंदा आणि दोषारोपांनी भरलेला ठरतो – तोच आवाज जो इतक्या काळापासून म्हणत होता: "फिरा, आपल्या मार्गावरून मागे फिरा; इस्राएल वंशजहो, तुम्ही का मरता?" (यहेज्केल ३३:११). एकदा तरी! तो आवाज त्यांच्या कानांना ओळखीचा वाटला असता! येशू म्हणतो: "मी हाक मारली पण तुम्ही आला नाहीत; मी आपला हात पुढे केला, पण कोणी लक्ष दिले नाही; 25तुम्ही माझ्या सर्व बोधाचा अव्हेर केला, व माझा वाग्दंड मुळी जुमानला नाही;" (नीतिसूत्रे १:२४-२५). तो आवाज अशा आठवणी जागवतो ज्या ते लोक विसरून टाकू इच्छितात – देवाचे नाकारलेले इशारे, शांतीचे आमंत्रणं, दुर्लक्षित विनवण्या. *(GC 642)*

जलप्रलयापुर्वीच्या काळातील वधस्तंभ, त्या रहस्यमय पडद्याला बाजूला करतो जो देवाला एक हत्यारा म्हणून दर्शवतो. त्याच्या राज्याची प्रेममूल्यं, शक्तीचा प्रयोग न करण्याची त्याची भूमिका आणि त्याच्या स्वभावाचं प्रतिबिंब असणारा नियम – ज्यामध्ये स्पष्टपणे "तू खून करू नकोस" असं म्हटलं आहे – हे सर्व आपल्याला साक्ष देतात की देव नाश करणारा नाही. केवळ ख्रिस्ताच्या वधस्तंभाच्या प्रकाशातच, नोहाच्या जलप्रलयाच्या कथेला योग्य अर्थ लागतो. वधस्तंभाच्या उजेडात, देवावर लावलेला हा आरोप – की तो एक कठोर प्रभू आहे – तो पूर्णपणे खोटा ठरतो.

या आयुष्यातील आणि येणाऱ्या जीवनातील सर्व आशीर्वाद कालवरीच्या वधस्तंभाच्या शिक्क्याने आपल्याला प्राप्त होतात. म्हणूनच, देवावर लावलेला आरोप की तो कठोर प्रभू आहे, जो न पेरता कापतो, हा खोटा आहे. *(COL 362.3)*

तसेच ख्रिस्ताने यरुशलेमवर येणाऱ्या रोमन संकटाबद्दल इशारा देण्यासाठी खूप प्रयत्न केले, तसंच त्याने नोहाच्या काळात देखील जगावर येणाऱ्या दुःखाच्या महापूराबाबत सतर्क करण्याचा प्रयत्न केला. यरुशलेमप्रमाणेच, ख्रिस्ताचा आत्मा शत्रू – म्हणजेच सैतानाच्या प्रेरणेखाली – रोमन साम्राज्याने नाश घडवू नये यासाठी त्यांना रोखण्याचा प्रयत्न करत होता. पण जेव्हा यहुद्यांनी ख्रिस्ताचा नाश करण्यासाठी रोमचा वापर केला, तेव्हा त्यांनी स्वतःचं विधि निश्चित केली.

या जगाच्या शेवटी, जे लोक ख्रिस्ताला वधस्तंभावर चढवतील, ते लोक आपल्या निर्णयांचा परिणाम स्वतःच्याच डोक्यावर येताना पाहतील:

अगदी स्पष्टतेने, शास्त्री आणि परुश्यांना कालवरीवरील घटनांची आठवण होते.

अंगावर शहारा आणणाऱ्या भीतीसह त्यांना आठवतं, की त्यांनी कसं सैतानी विचारात डोकं हलवत म्हटलं होतं की– *"त्याने दुसऱ्यांना वाचवले; त्याला स्वतःला वाचवता येत नाही; तो इस्राएलाचा राजा आहे; त्याने आता वधस्तंभावरून खाली उतरावे, म्हणजे आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवू. 'तो देवावर भरवसा ठेवतो; तो त्याला हवा असेल तर त्याने त्याला' आता 'सोडवावे'; कारण मी देवाचा पुत्र आहे, असे तो म्हणत असे." (मत्तय २७:४२–४३).*

त्यांना तारणाऱ्याने सांगितलेला *(द्राक्षबाग व मालकाचा)* दृष्टांत अगदी जिवंतपणे आठवतो – ज्या दासांनी आपल्या प्रभूला द्राक्षबागेचं उत्पन्न द्यायला नकार दिला, आणि त्याच्या सेवकांना अपमानित केलं व त्याच्या पुत्राला ठार मारलं. त्यांना त्या शिक्षेची आठवण होते, जी त्यांनीच आपल्या तोंडाने मिळवली होती*: "द्राक्षबागेचा मालक त्या दुष्ट माणसांचा भयानक नाश करील."* आता त्या अपवित्र, विश्वासघातकी लोकांच्या पापांत आणि त्यांना झालेल्या शिक्षेमध्ये, शास्त्री आणि परुश्यांना स्वतःचा प्रवास आणि स्वतःच्या योग्य शिक्षेचं प्रतिबिंब दिसतं. आणि मग यरुशलेमच्या रस्त्यांमध्ये घुमणाऱ्या *"त्याला क्रूसावर चढवा! त्याला क्रूसावर चढवा!"* या घोषणेपेक्षाही ती किंकाळी अधिक जोरात आणि भीतीदायक असते – *"तो देवाचा पुत्र आहे! तोच खरा मसीहा आहे!" (GC 643–644)*

जसं यहुद्यांनी रोमन सरकारचा वापर करून ख्रिस्ताला क्रूसावर चढवलं, तसंच पुढच्या पिढीत रोमन सैनिकांनी देखील हजारो यहुद्यांना त्याच प्रकारे क्रूसावर लटकवलं. नोहाच्या काळातही लोकांनी ख्रिस्ताच्या आत्म्याच्या विनवण्या ऐकूनही त्याला नाकारलं, आणि त्यांनी ख्रिस्ताशी जे आध्यात्मिकरित्या केलं, त्याचा शारीरिक परिणाम त्यांच्यावरच उलट झाला.

स्तोत्र ७:१४-१६ पाहा, तो मनुष्य दुष्कर्माच्या वेणा देतो; उपद्रवाची गर्भधारणा करतो व असत्याला प्रसवतो. त्याने खड्डा खणून खोल केला; आणि तोच त्या खड्ड्यात पडला. त्याने केलेला उपद्रव त्याच्याच शिरी पडेल; त्याचा जुलूम त्याच्याच माथी येईल.

सुमारे १५०० वर्षं जलप्रलयपूर्व काळातली मंडळी ख्रिस्ताने तिच्यात रोवलेलं बीज स्वीकारण्याचा प्रयत्न करत होती. पण त्या बीजाला वारंवार नकार दिल्यामुळे शेवटी एक भयानक गर्भपात झाला. जेव्हा त्या स्त्रीच्या पाण्यांची पिशवी फुटली, तेव्हा तिच्या आत असलेलं ख्रिस्ताचं प्रेत – म्हणजे मृत बीज – त्या लोकांच्या जीवनातून प्रकट झालं, ज्यांनी ते बीज नाकारलं होतं. जेव्हा एखाद्या स्त्रीचा गर्भपात होतो, तेव्हा आपण तिला तिच्या बाळाच्या हत्येचा दोष देतो का? नक्कीच नाही! तो एक दुःखद प्रसंग असतो, पण त्यातून हे स्पष्ट होतं की जन्माच्या प्रक्रियेत काहीतरी चुकलं होतं. गर्भपात म्हणजे काहीतरी नकार झालाय हेच त्याचं लक्षण आहे. नोहाच्या काळातल्या मंडळीने ख्रिस्ताच्या बीजाचा एक भयंकर गर्भपात केला.

यशया १३:८-९ ते अगदी घाबरले आहेत. त्यांना पेटके व वेदना घेरत आहेत; प्रसूत होणाऱ्या स्त्रीप्रमाणे ते वेणा देत आहेत. एकमेकांकडे टकमक पाहत आहेत; त्यांची मुखे काळवंडली आहेत. पाहा, रोष व तीव्र क्रोध ह्यांनी कठोर झालेला असा परमेश्वराचा दिवस येत आहे; तो देश उजाड करून सोडील, त्यातील पातक्यांचा संहार करील.

यशया २१:३-४ हे पाहून माझ्या कंबरेस कळा लागल्या आहेत; प्रसूत होणाऱ्या स्त्रीच्या वेदनांप्रमाणे मला वेदना होत आहेत; मी एवढे आळेपिळे देत आहे की मला ऐकू येत नाही; मी इतका घाबरलो आहे की मला दिसत नाही. माझे हृदय धडधडते; भीतीने मी त्रस्त झालो आहे; माझी आवडती वेळ संध्याकाळ मला कंपित करणारी झाली आहे.

जर कोणी इथपर्यंत वाचूनही अजूनही हेच मानत असेल की, "देवाला पाप्यांचा कंटाळा आला म्हणून त्याने त्यांना नष्ट करण्यासाठी जलप्रलय पाठवला", तर अशा लोकांनी देवाच्या स्वभावाचं गंभीर चुकीचं चित्र रेखाटलं आहे. अशा विचारसरणीमुळे देवावर असे पद्धतीचे दोष लावले जातात, जे त्याच्या प्रेमाच्या आणि न्यायाच्या नियमांशी पूर्णपणे विसंगत आहेत. तसंच, असे लोक कधीच मृत्यूच्या भीतीपासून मुक्त होऊ शकणार नाहीत आणि खऱ्या अगापे प्रेमाचा अनुभव घेऊ शकणार नाहीत.

खरं स्वातंत्र्य मिळवायचं असेल, तर मृत्यूची भीती गमवणं गरजेचं आहे. ख्रिस्ताने मृत्यू नष्ट केला आहे आणि सुवार्तेमुळे जीवन आणि अमरत्व प्रकट केलं आहे. आता वेळ आली आहे – आपल्या पित्याचा सर्व मनापासून शोध घेण्याची, आपल्या प्रिय पित्याविषयी हजारो वर्षं चालत आलेल्या खोट्या प्रचाराला नकार देण्याची – तो पिता जो कायम दयाळू, कोमल, सहनशील, दीर्घशांत आहे, आणि जो प्रत्येक व्यक्तीला त्याच्या निवडीचं फळ देतो. मी आपल्याला विनवतो – इतिहासात घडलेल्या प्रत्येक मोठ्या विनाशाच्या घटनेत ख्रिस्ताचा क्रूस पाहण्याचा प्रयत्न करा. कदाचित दुसऱ्या महायुद्धात जे लाखो लोक मरण पावले, ते १८८८ मध्ये ख्रिस्ताच्या क्रूसाच्या पुनरावृत्तीचेच प्रतीक होते – जेव्हा ॲडव्हेंटिस्ट पायनियर मंडळींनी त्यांच्यावर आलेल्या सत्याला जाणीवपूर्वक आणि ठाम नाकारलं, आणि त्यामुळं संपूर्ण जग अंधारात आणि युद्धात बुडून गेलं.

आपल्याला सध्याच्या वेळी येणारा हा संदेश खोलवर विचारात घ्यायला हवा. कारण याचं नाकारणं कदाचित जगाच्या अंतिम नकाराला चालना देऊ शकतं. आणि पुन्हा एकदा, ख्रिस्ताच्या दुःखाच्या आणि नकाराच्या प्रतिसादात अधार्मिक माणसांची एक प्रलयासारखी लाट संपूर्ण जगावर वाहत जाईल.

ज्यांच्याकडे ऐकण्यासाठी कानं आहेत, त्यांनी आत्मा मंडळीला काय सांगतो ते ऐकावे

# ख्रिस्ताचा जलप्रलयापूर्वीचा वधस्तंभ

पौल म्हणतो, “वधस्तंभावर खिळलेला येशू ख्रिस्त, ह्याच्याशिवाय मी तुमच्याबरोबर असताना दुसरे काही जमेस धरू नये असा मी ठाम निश्चय केला.” शास्त्रात नोंदवलेल्या सर्व प्रमुख विनाशाच्या घटनांमध्ये ख्रिस्ताचा वधस्तंभ प्रकट होतो. त्याच्या मुलांवर आलेल्या प्रत्येक क्लेशात ख्रिस्त स्वतः दुःखित होतो.

सुरुवातीपासूनच ख्रिस्ताचं बीज – म्हणजे त्याचं वचन – स्त्रीला दिलं गेलं, आणि ती स्त्री म्हणजे त्याची मंडळी. जलप्रलयापूर्व काळात संपूर्ण काळात ही स्त्री — म्हणजे मंडळी — ख्रिस्ताला त्यांच्यामध्ये प्रकट करण्यासाठी, जो की गौरवाची आशा आहे, ती वेदना आणि तळमळ अनुभवत होती. पण त्यांनी त्याच्या पवित्र आत्म्याला शोकावले आणि सत्य दडपून टाकलं. त्यांनी त्याचा आवाज पूर्णपणे दाबून टाकला आणि त्याला अत्यंत दुःख दिलं.

स्तोत्रांमधील भाषेत, ख्रिस्त जलप्रलयपूर्व काळातील त्याच्या वधस्तंभाविषयी अशा शब्दांत बोलतो:

स्तोत्र १८:११ त्याने आपणाला काळोखाने आच्छादून घेतले, त्याने आपणाला आकाशातील मेघमय अंधाराचा, दाट ढगांचा मंडप केला.

स्तोत्र १८:१५ तेव्हा हे परमेश्वरा, तुझ्या धमकीने, तुझ्या नाकपुड्यांतील श्वासाच्या सोसाट्याने जलाशयाचे तळ दिसू लागले, पृथ्वीचे पाये उघडे पडले.

आपला स्वर्गीय पिता आपल्याला त्याच्या आज्ञा पाळायला भाग पाडण्यासाठी मृत्यूची भीती दाखवत नाही. त्याचा नियम म्हणजे त्याच्या स्वभावाचं प्रतिबिंब आहे, आणि तो नियम म्हणतो, “तू खून करू नकोस.” वधस्तंभावरील मृत्यूद्वारे ख्रिस्ताने हे स्पष्टपणे दाखवून दिलं आहे की, देव कधीच बंडखोरांना ठार मारण्याची धमकी देत नाही. वधस्तंभ आपल्याला दाखवतो की, जे लोक देवाला नाकारतात, देव त्यांना त्यांच्या स्वतःच्या निवडींच्या आणि कृतींच्या परिणामांसोबत एकटेच सोडतो. जसं यरुशलेमने रोमन सरकारचा वापर करून ख्रिस्ताला वधस्तंभावर लटकवलं, आणि नंतर चाळीस वर्षांनी त्या रोमन सैनिकांनी यरुशलेमच्या नागरिकांना हजारोंच्या संख्येने वधस्तंभा लटकवलं, तसंच जलप्रलयपूर्व लोकांनी ख्रिस्ताच्या आत्म्याचा आवाज दडपून टाकला, आणि शेवटी, त्यांनी ज्याप्रमाणे आत्मिकरित्या ख्रिस्ताला नाकारलं, त्याचप्रमाणे ते शारीरिकरित्या पाण्यात बुडाले — ते म्हणजे त्यांच्या स्वतःच्याच कृतींचे स्वरूप.